सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २९ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १९३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

'अर्णब' चा हाहाकार; विशाखापट्टणममध्ये 18 तासांत ढगफुटीसदृश पाऊस, 3 जणांचा मृत्यू तर 87 हजार नागरिकांचे स्थलांतर

विशाखापट्टणम : बंगालच्या उपसागरात आकारास आलेल्या 'अर्णब' या अतितीव्र चक्रीवादळाने मंगळवारी आंध्र प्रदेशच्या किनारी भागात धडक देत प्रचंड तांडव मांडले आहे. किनारपट्टीवर ताशी १२५ ते १३५ किलोमीटरच्या वादळी वेगाने वाहणारे वारे आणि मुसळधार पावसामुळे मोठे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत आंध्र प्रदेशात तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून सुमारे ३१ घरांची मोठी पडझड झाली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने युद्धपातळीवर आपत्कालीन उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे.

या चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका विशाखापट्टणम शहराला बसला आहे. शहरात अवघ्या १८ तासांच्या कालावधीत २०० मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊस जुलै महिन्यातील सरासरी पर्जन्यमानाच्या (१३३ मिमी) दीड पटीपेक्षा अधिक आहे. पावसाच्या या धुमाकूळामुळे दळणवळण व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे. विजयवाडा आणि विशाखापट्टणम विमानतळांवरून उड्डाण करणारी २१ विमाने तातडीने रद्द करण्यात आली आहेत. सुमारे ५० रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या असून विशाखापट्टणम-किरंदुल, राउरकेला-जगदलपूर आणि हिराखंड एक्सप्रेससह २२ प्रमुख गाड्यांच्या फेऱ्या ५ नोव्हेंबरपर्यंत रद्द किंवा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. काही गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी 'NTES' ॲप किंवा भारतीय रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावरून खात्री करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

८७ हजार नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर; हवाई दलाकडून २३ टन मदत साहित्य

आपत्तीच्या काळात जीवितहानी टाळण्यासाठी आंध्र प्रदेशातून ५७ हजार आणि ओडिशामधून ३० हजार अशा एकूण ८७ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. बाधित नागरिकांच्या निवासासाठी दोन्ही राज्यांमध्ये मिळून तब्बल ४ हजार चक्रीवादळ निवारा केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून ओडिशातील १६ जिल्ह्यांमधील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दुसरीकडे, भारतीय हवाई दलानेही बचावकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. हवाई दलाच्या दोन 'सी-१३० जे' (C-130J) विमानांद्वारे विजयवाडा येथे २३ टन मदत साहित्य आणि एनडीआरएफचे (NDRF) विशेष पथक तातडीने पाठवण्यात आले आहे.

प्रशासकीय यंत्रणा सतर्क; मुख्यमंत्र्यांकडून आढावा

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी अमरावती येथील 'रिअल टाइम गव्हर्नन्स सोसायटी सेंटर'शी संपर्क साधून चक्रीवादळग्रस्त जिल्ह्यांतील स्थितीची सविस्तर माहिती घेतली आहे. बाधित क्षेत्रांमध्ये मदत आणि बचावकार्य वेगाने राबवण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशसह ९ राज्यांना अतिवृष्टीचा इशारा :

आंध्र प्रदेश व ओडिशा: सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिमुसळधार पाऊस आणि सखल भागात पूर येण्याचा इशारा.

तेलंगणा व छत्तीसगड: २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी काही भागांत मुसळधार ते अतिवृष्टीची शक्यता.

महाराष्ट्र व मध्य प्रदेश: विदर्भ आणि पूर्व मध्य प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज.

बिहार व झारखंड: २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान पावसाचा अंदाज असून २९-३० ऑक्टोबरला बिहारमध्ये जोरदार पावसाची शक्यता.

उत्तर प्रदेश: २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी पूर्व उत्तर प्रदेशात मुसळधार ते अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

नोएल टाटा 12 नोव्हेंबरला सहा कंपन्यांच्या मंडळातून पायउतार होणार

मुंबई टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा १२ नोव्हेंबर २०२६ रोजी टाटा समूहाच्या सहा कंपन्यांच्या संचालक मंडळातून पायउतार होणार आहेत. त्या दिवशी ते ७० वर्षांचे होत असून, कार्यकारी नसलेल्या संचालकांसाठी ७० वर्षे ही निवृत्तीची वयोमर्यादा असल्याने हा बदल होत आहे.

टायटन, टाटा स्टील, टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन, व्होल्टास, टाटा इंटरनॅशनल आणि ट्रेंट या सहा कंपन्यांच्या मंडळातून ते बाहेर पडतील. मात्र, टाटा सन्सच्या मंडळावर ते टाटा ट्रस्टचे प्रतिनिधी संचालक म्हणून कायम राहतील. टाटा ट्रस्टकडे टाटा सन्समधील सुमारे ६६ टक्के हिस्सा असल्याने समूहाच्या केंद्रस्थानी त्यांची भूमिका कायम राहणार आहे.

ट्रेंट हायपरमार्केटच्या मंडळावरही ते राहतील. रतन टाटा यांच्या निधनानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये नोएल टाटा टाटा ट्रस्टचे अध्यक्ष झाले होते. सध्या टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीवरून ट्रस्ट आणि टाटा सन्स यांच्यात मतभेद सुरू आहेत. १७ सप्टेंबरच्या मंडळ बैठकीत चंद्रशेखरन यांच्या तिसऱ्या कार्यकाळाला आणि टाटा सन्सच्या शेअरबाजारातील सूचीकरणाला नोएल टाटा यांनी विरोध केला होता. या वादावर आज राजकीय प्रतिक्रियाही उमटल्या. सहा कंपन्यांतील उत्तराधिकारी नियुक्त्यांची औपचारिक घोषणा अद्याप बाकी आहे.

नागपूर, अमरावती, पुण्यावर महायुतीचा झेंडा! विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस, उबाठाचा सुफडा साफ

भाजप 2, शिवसेना 1, शरद पवार गटाला 2 जागा

मुंबई : विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीत महायुतीने तीन जागा जिंकत वर्चस्व मिळवले, तर महाविकास आघाडीला दोन जागांवर समाधान मानावे लागले. नागपूर आणि पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपने विजय मिळवला. तर, तर अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेने बाजी मारली. पुणे शिक्षक आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाची जागा शरद पवार गटाने जिंकली. याउलट काँग्रेस आणि उबाठाला एकही जागा मिळवता आली नाही.

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे यांनी विजय मिळवला. या मतदारसंघात काँग्रेसचे अभिजीत वंजारी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाचे नितेश कराळे आणि शिक्षक भारतीचे अतुल देशमुख यांच्याशी त्यांची लढत झाली. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी झाले. त्यांच्याविरोधात शिंदे यांच्या शिवसेनेचे पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सानप आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर मैदानात होते. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघांत भाजपने आपले वर्चस्व सिद्ध केले.

अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी विजय मिळवला. काँग्रेसच्या अदिती पोहरे, अपक्ष संगीता शिंदे आणि उबाठाचे दत्तात्रय लहाने यांच्याशी त्यांची लढत झाली. या विजयामुळे महायुतीच्या खात्यात शिवसेनेची एक जागा जमा झाली. दुसरीकडे, पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांनी विजय मिळवला. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातही याच पक्षाचे प्रतापसिंग पाटील विजयी झाले. त्यामुळे महाविकास आघाडीला मिळालेल्या दोन जागांमध्ये शरद पवार गटाचा वाटा राहिला. या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंतील बंडखोरीमुळे राजकीय चुरस निर्माण झाली होती. सुमारे ३० तास चाललेल्या मतमोजणीनंतर पाचही जागांचे निकाल स्पष्ट झाले.

सोमालियात अल-शबाबच्या भीषण हल्ल्यात 20 सैनिकांचा मृत्यू

मोगादिशू: सोमालियाची राजधानी मोगादिशूमधून एक मोठी आणि खळबळजनक बातमी समोर आली आहे. अल-कायदाशी संबंधित असलेल्या 'अल-शबाब' या कुख्यात दहशतवादी संघटनेने दक्षिण सोमालियातील जामिका गावाजवळ सोमालियाच्या लष्करी ताफ्यावर अचानक भीषण हल्ला केला. या रक्तरंजित हल्ल्यात किमान 20 सैनिकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. हल्ल्यातून बचावलेल्या एका लष्करी अधिकाऱ्याने याला दुजोरा दिला असून, अनेक तास चाललेल्या या संघर्षाने परिसरात दहशत पसरवली आहे.

सोमालिया सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, या तीव्र चकमकीत लष्कराच्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर देत सुमारे 75 दहशतवाद्यांना कंठस्नान घातले, तर 56 हून अधिक दहशतवादी जखमी झाले आहेत. मात्र, दुसरीकडे अल-शबाब संघटनेने एक अत्यंत खळबळजनक दावा केला आहे. या हल्ल्यात तब्बल 321 सैनिकांना ठार मारल्याचा दावा या संघटनेने केला असून, काही सैनिकांना बंदी बनवून लष्करी उपकरणे देखील ताब्यात घेतल्याचे म्हटले आहे. मात्र, या अतिशयोक्तीपूर्ण दाव्यांची अद्याप कोणतीही स्वतंत्र पुष्टी झालेली नाही. लष्करी ताफ्यासोबत प्रवास करणारे अधिकारी अब्शीर अब्दिकरीम यांनी दिलेल्या माहितीनुसार, सैनिक लीगो येथून प्रवास करत बे प्रदेशातील बुर्हाकाबा जिल्ह्यातील जामिका येथे पोहोचले होते, जिथे त्यांच्यावर हा घातपात करण्यात आला. हल्ल्यानंतर त्यांनी स्वतः आपल्या किमान 20 सहकाऱ्यांचे मृतदेह पाहिल्याचे सांगितले.

शेतात झोपलेल्या 65 वर्षीय वृद्धावर बिबट्याचा हल्ला; काठीने प्रतिकार करत वाचवला जीव!

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि. २८ ऑक्टोबर — सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या उपळा शिवारात शेतात झोपलेल्या ६५ वर्षीय वृद्धावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना बुधवारी (दि. २८) मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास घडली. या हल्ल्यात बिबट्याने वृद्धाच्या हाताला चावा घेतला. मात्र, प्रसंगावधान राखत वृद्धाने जवळील काठीने बिबट्याच्या तोंडावर प्रहार केला. त्यामुळे बिबट्या पळून गेला आणि वृद्धाचा जीव वाचला. गणपत कन्नीराम जाधव (वय ६५, रा. भांबरवाडी) असे जखमी वृद्धाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणपत जाधव यांचे उपळा शिवारातील गट क्रमांक ५० मध्ये शेत आहे. ते शेतात झोपलेले असताना मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे जाधव यांच्यासमोर जीव वाचवण्याचे आव्हान उभे राहिले. बिबट्याच्या

तावडीतून सुटण्यासाठी त्यांनी जवळ असलेली काठी उचलून बिबट्याच्या तोंडावर प्रहार केला. या प्रतिकारामुळे बिबट्याने तेथून पळ काढला.

हल्ल्यात जखमी झालेल्या जाधव यांनी कसेबसे गाव गाठले. बुधवारी सकाळी गावातील खासगी दवाखान्यात त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पंकज जाधव यांनी त्यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉ. अनिरुद्ध गायकवाड यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. बिबट्याच्या हल्ल्यात जाधव यांच्या हाताला चावा लागल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेची माहिती राहुल राठोड आणि साईदास जाधव यांनी वनविभागाला दिली. माहिती मिळताच वनपाल प्रवीण पारधी,वनरक्षक वाय. डी.साळवे, वनरक्षक व्ही. एस.तुपे, घटनास्थळी दाखल झाले. महामार्गालगतच्या शिवारात घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतात रात्रीच्या वेळी काम करणाऱ्या तसेच शेतात मुक्काम करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे.

भारताच्या पहिल्या सिंधुदुर्गातील अंडरवॉटर म्युझियम प्रकल्पाचा गौरव, 'आयएनएस गुलदार'ला पुरस्कार

मुंबई: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी पर्यटनाला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या पर्यटन विभागाचा सन्मान करण्यात आला आहे. पर्यटन विभागांतर्गत, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) महत्वाकांक्षी 'आयएनएस गुलदार' या प्रकल्पाला प्रतिष्ठेचा 'द वीक हेरिटेज ॲवॉर्ड– गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड 2026' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ, पाणबुडी पर्यटन प्रकल्प विकसित होत असल्यामुळे या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.

'द वीक हेरिटेज ॲवॉर्ड- गोल्डन बॅनियन ॲवॉर्ड 2026' या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम प्रधानमंत्री संग्रहालय आणि ग्रंथालय नवी दिल्लीमध्ये 27 ऑक्टोबर 2026 रोजी आयोजित करण्यात आला होता. हा पुरस्कार, केंद्रीय संस्कृती व पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांनी हा पुरस्कार घेतला. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे,

दक्षिण काशी पैठणमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाची तयारी!

31 ऑक्टोबरला मोक्षघाटावर सोहळा; 31 फुटी खांबावर 15 फुटी ध्वज फडकणार; खा. संदीपान भुमरे, आ.विलास बापू भुमरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ : दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक पैठण नगरीत सिंहस्थ कुंभमेळा सोहळ्याच्या प्रारंभाची तयारी सुरू झाली आहे. गोदावरी नदीच्या तीरावरील कृष्णकमळ तथा दोलेश्वर तीर्थावरील मोक्षघाट येथे शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात ३१ फुटी उंच खांबावर १५ फुटी भव्य ध्वज फडकविण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार संदीपान भुमरे व पैठणचे आमदार विलास बापू भुमरे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असून यावेळी नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर ,सर्व नगरसेवक,प्रमुख संत-महंत, महाराज, साधू-संन्यासी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती सिंहस्थ कुंभमेळा शाही स्नान आयोजन समितीच्या वतीने देण्यात आली.

शाही स्नानाच्या परंपरेला ऐतिहासिक संदर्भ

पैठण येथील सिंहस्थ कुंभमेळा आणि शाही स्नानाच्या परंपरेविषयी अनेक ऐतिहासिक संदर्भ आणि आख्यायिका प्रचलित आहेत. सातवाहन काळात साधुसंतांना आमंत्रित करून कृष्णकमळ तीर्थावर धार्मिक विधी केल्याचे सांगितले जाते. ब्रह्मचारी दंडास्वामी, संत एकनाथ महाराज, संत भानुदास महाराज आणि गागाभट्ट यांच्याशी संबंधित संदर्भही या परंपरेच्या कथनात आढळतात.

विविध मठांतील साधू-संत, मुनी, त्यागी, बैरागी, मंडलेश्वर, महामंडलेश्वर, नागा साधू आणि वैष्णव साधू यांच्या सहभागातून शाही स्नानाचे आयोजन होत असल्याचे सांगितले जाते. सन २००३ आणि २०१५ मध्ये पैठण येथे लाखो भाविकांच्या उपस्थितीत भव्य शाही स्नान सोहळे पार पडल्याचे आयोजन समितीकडून सांगण्यात आले.

फुलंब्री तहसील मध्ये शिपायाच्या जागी कुत्र्याचा हजरी; "तहसीलदारांचा एवढा वचक की शिपाईही घाबरून पळाले?" - नागरिकांमध्ये चर्चेला उधाण

फुलंब्री प्रतिनिधी: फुलंब्री तहसील कार्यालयात सध्या एक अजब आणि लाजिरवाणा प्रकार समोर आला आहे. तहसीलदार साहेबांच्या दालनासमोर जिथे शिपाई उभा असायला हवा, तिथे चक्क एक भटका कुत्रा पहारा देत असल्याचे चित्र आज सकाळी नागरिकांनी पाहिले.

कायदा-सुव्यवस्थेचे मंदिर समजल्या जाणाऱ्या तहसील कार्यालयातच जर अशी परिस्थिती असेल, तर सर्वसामान्य जनतेचे प्रश्न कोण सोडवणार? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

तहसीलदारांचा वचक की प्रशासनाचे अपयश?

यावरून दोनच गोष्टी लक्षात येतात. एक तर फुलंब्री तालुक्यात तहसीलदार साहेबांचा एवढा दरारा / वचक आहे की, शिपायालाही त्यांच्या दालनासमोर उभे राहायची भीती वाटते, म्हणून त्याने कुत्र्याला ड्युटीवर ठेवले आहे. किंवा दुसरे म्हणजे तहसील प्रशासन एवढे बेजबाबदार झाले आहे की, कार्यालयात शिपाई आहे की नाही, याचेही भान त्यांना राहिलेले नाही.

*नागरिक त्रस्त

तहसीलदारांना भेटण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना आत जायचे की नाही, कुत्र्याला विचारायचे का? अशी पंचाईत झाली होती. अनेक वृद्ध शेतकरी तासंतास बाहेर उभे होते, पण त्यांना आत सोडण्यासाठी साधा शिपाईही नव्हता. त्यामुळे "साहेब आहेत की नाहीत हे कुत्राच सांगेल" अशी कुजबुज नागरिकांमध्ये सुरू होती.

एकीकडे शासन "आपले सरकार, गतिमान प्रशासन" म्हणते, तर दुसरीकडे फुलंब्री तहसीलमध्ये कुत्र्याच्या भरवशावर प्रशासन चालले आहे. हा प्रकार फुलंब्री तालुक्याच्या प्रतिमेला काळिमा फासणारा आहे.

जिल्हाधिकारी साहेबांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन फुलंब्री तहसीलमधील गैरहजर कर्मचारी व बेशिस्त कारभारावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. अन्यथा फुलंब्री तहसीलला "कुत्रा तहसील" म्हणून ओळखावे लागेल.

एनसीएमसी कार्ड रिचार्ज मिळेना;ज्येष्ठ नागरिकांसह महिलांकडून फुल तिकीट वसूल!

एस.टी. महामंडळाच्या सवलत योजनांचा बोजवारा; एजंटकडे रिचार्ज नाही,बसमध्येही सुविधा मिळत नसल्याने प्रवाशांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप

तुषार सराफ,लासूर स्टेशन

लासूर स्टेशन : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना सवलतींचा लाभ घेताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र समोर येत आहे.

एनसीएमसी कार्ड रिचार्ज करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीच्या एजंटकडे रिचार्जची सुविधा मिळत नसल्याने तसेच बसमध्येही रिचार्ज करून मिळत नसल्याने प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

शासनाच्या नियमानुसार पात्र ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एस.टी. प्रवासात भाडेसवलतीचा लाभ मिळतो. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या एनसीएमसी कार्डचे रिचार्जच उपलब्ध होत नसेल,

तर प्रवाशांनी सवलतीचा लाभ घ्यायचा कसा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एनसीएमसी कार्ड रिचार्ज करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर असताना नियुक्त एजंटकडे रिचार्ज मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.

तसेच बसमध्ये वाहकाकडून रिचार्ज करून देण्याची सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित असतानाही प्रत्यक्षात रिचार्ज मिळत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.

याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसत आहे. कार्ड रिचार्ज नसल्यामुळे सवलतीच्या तिकिटाऐवजी अनेक प्रवाशांकडून पूर्ण तिकीट आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

शासनाने सवलत जाहीर करायची आणि तांत्रिक सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना पूर्ण भाडे भरावे लागायचे, तर या योजनांचा प्रत्यक्ष उपयोग काय,असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

सवलत कागदावर,प्रत्यक्षात मात्र पूर्ण तिकीट!



"शासनाने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी भाडेसवलत जाहीर केली आहे; मात्र एनसीएमसी कार्ड रिचार्ज मिळत नसेल,तर या सवलतीचा उपयोग काय? रिचार्जसाठी एजंटकडे गेल्यानंतरही सुविधा मिळत नाही आणि बसमध्येही रिचार्ज होत नसल्याने आम्हाला नाइलाजाने पूर्ण तिकिट काढावे लागते.शासनाने सवलत द्यायची आणि प्रत्यक्षात तिचा लाभच मिळू नये, ही खेदाची बाब आहे.एस.टी. महामंडळाने तातडीने याकडे लक्ष देऊन ज्येष्ठ नागरिक व महिलांची होणारी गैरसोय दूर करावी."

एनसीएमसी कार्ड रिचार्जची व्यवस्था सुरळीत ठेवणे,नियुक्त एजंटकडे पुरेशी सुविधा उपलब्ध करून देणे आणि बसमध्ये रिचार्जची सुविधा प्रत्यक्षात कार्यान्वित आहे की नाही,याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

अन्यथा शासनाच्या सवलतींचा लाभ मिळण्याऐवजी ज्येष्ठ नागरिक व महिलांना आर्थिक नुकसान सहन करावे लागणार आहे.

एस.टी. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन एनसीएमसी कार्ड रिचार्जची सुविधा सुरळीत करावी,

सवलतीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या पात्र प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण करावे आणि संबंधित यंत्रणेची जबाबदारी निश्चित करावी,अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

एआई प्लस स्मार्टफोनची किमतीतवाढ जाहीर

छत्रपती संभाजीनगर : एआय प्लस स्मार्टफोनने आज आपल्या स्मार्टफोन पोर्टफोलिओमधील निवडक मॉडेल्सच्या किमतीत 15 नोव्हेंबर 2026 पासून वाढ करण्याची घोषणा केली. विशेषतः किमतीबाबत संवेदनशील विभागांमध्ये खर्चाचा दबाव कायम असल्याने, कंपनीने त्याच्या परिणामांचे मूल्यमापन सुरू ठेवले असून ग्राहकांसाठी परवडणारी किंमत राखण्याचा प्रयत्न केला आहे. सुधारित किमतींनुसार, एआय पल्स पल्स २ एफई, पल्स २ , नोव्हा २ निओ ५जी, नोव्हा २ पॉवर ५जी, नोव्हा २ प्रो ५जी आणि नोव्हा २ अल्ट्रा ५जी च्या निवडक व्हेरिएंट्सच्या किमतीत ₹1,000 ते ₹3,000 पर्यंत वाढ होईल. एआय पल्स नोव्हाफ्लिप ५जी ची किंमत ₹49,999 वर कायम राहील.

एंटाला इंडस्ट्रीजचा ₹23.33 कोटींचा आयपीओ 29पासून खुला

छत्रपती संभाजीनगर : बीओपीपी लॅमिनेटेड बॅग्ज आणि पॉलीप्रॉपिलीन विणलेल्या पॅकेजिंग उत्पादनांची उत्पादक एंटाला इंडस्ट्रीज लिमिटेडचा ₹२३.३३ कोटींचा आयपीओ २९ ऑक्टोबर २०२६ रोजी खुला होणार असून, २ नोव्हेंबरला बंद होईल. प्रति शेअर किंमतपट्टा ₹६३ ते ₹६७ निश्चित करण्यात आला आहे. या इश्यूमध्ये ३४.८२ लाख नवीन इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. कंपनीने ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या सहामाहीत ₹३०.११ कोटींचा परिचालन महसूल आणि ₹४.१९ कोटींचा करानंतरचा नफा नोंदवला. या कालावधीत कंपनीचा ईबीआयटीडीए ₹५.७६ कोटी होता. कंपनीचे शेअर्स बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होणार आहेत. संभाव्य सूचीकरणाची तारीख ५ नोव्हेंबर २०२६ आहे.

नव्याने येणाऱ्या 15 टक्के रुग्णांचे यापूर्वीचे आयव्हीएफ उपचार अयशस्वी

छत्रपती संभाजीनगर : आयव्हीएफ उपचार करूनही गर्भधारणा होत नसलेल्या जोडप्यांना पुन्हा उपचार करावेत का, असा प्रश्न पडतो. मात्र, प्रत्येक वेळी नव्याने उपचार सुरू करण्यापूर्वी त्यापुर्वीच्या प्रयत्नात नेमके कुठे अडथळे आले, हे समजून घेणे महत्त्वाचे असते. नोवा आयव्हीएफ फर्टिलिटीच्या छत्रपती संभाजीनगर येथील केंद्राने दिलेल्या माहितीनुसार नव्याने येणाऱ्या रुग्णांपैकी सुमारे १५ टक्के रुग्णांचे यापूर्वी एक किंवा अधिक वेळा आयव्हीएफ उपचार अपयशी ठरलेले असतात. त्यामुळे आधीच्या उपचारांचा आढावा घेऊन पुढील उपचारांचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे असे प्रजनन तज्ज्ञ सांगतात.आयव्हीएफ उपचार अयशस्वी होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. गर्भाच्या वाढीशी संबंधित समस्या, गर्भाशयाची स्थिती, हार्मोन्समधील असंतुलन, शरीरातील इतर आजार आणि आरोग्य समस्यांमुळे उपचारांना अपेक्षित यश मिळत नाही. त्यामुळे आधीच्या प्रयत्नात अपयश आले म्हणून पुन्हा त्याच पद्धतीने उपचार करणे योग्य ठरेलच असे नाही. आधीच्या उपचारांची माहिती आणि तपासण्यांचे निष्कर्ष यांच्या आधारे पुढील उपचारपद्धतीत काही बदल आवश्यक आहेत का, हे डॉक्टर ठरवू शकतात.

कृषी उपकरण खरेदी आता अधिक सोपी

पुणे : कृषी यांत्रिकीकरण आणि ग्रामीण उपकरण क्षेत्रातील पुढच्या पिढीचे ॲग्री-टेक व्यासपीठ 'ट्रॅक्टरनेक्स्ट' चे अनावरण ट्रॅक्टर अँड मेकॅनायझेशन असोसिएशन चे अध्यक्ष आणि कृषी यंत्रसामग्री उद्योगातील दिग्गज श्री. जी. एस. ग्रेवाल यांच्या हस्ते पुण्यात पार पडले. शेतकरी, ग्रामीण उद्योजक आणि खरेदीदारांना उपकरणांची माहिती सुलभपणे मिळावी आणि योग्य निर्णय घेता यावा, यासाठी हे व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे.

कृषी यांत्रिकीकरण झपाट्याने बदलत असताना, शेतकरी आणि ग्रामीण व्यावसायिकांना आता उपकरणांची उपयुक्तता, कार्यक्षमता, तंत्रज्ञान, परिचालन खर्च आणि दीर्घकालीन मूल्य या निकषांवर मूल्यमापन करावे लागते. ट्रॅक्टरनेक्स्ट ही गरज ओळखून एका सामाईक डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून उत्पादनांची माहिती, तुलना साधने आणि संबंधित तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देत आहे.

एंटाला इंडस्ट्रीजचा आयपीओ 29 ऑक्टोबरला खुला

मुंबई : पॅकेजिंग उत्पादने तयार करणाऱ्या एंटाला इंडस्ट्रीज लिमिटेडचा ₹२३.३३ कोटींचा आयपीओ २९ ऑक्टोबर २०२६ रोजी खुला होणार असून, २ नोव्हेंबरला बंद होईल. प्रति शेअर किंमत ₹६३ ते ₹६७ निश्चित करण्यात आली आहे. या आयपीओअंतर्गत कंपनी ३४.८२ लाख नवीन इक्विटी शेअर्स जारी करणार आहे.कंपनीने ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या सहामाहीत ₹३०.११ कोटींचा परिचालन महसूल आणि ₹४.१९ कोटींचा करानंतरचा नफा नोंदवला. याच कालावधीत कंपनीचा ईबीआयटीडीए ₹५.७६ कोटी होता. कंपनीचे शेअर्स बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सूचीबद्ध होण्याची अपेक्षा आहे.

'वन सिमेंट प्लॅटफॉर्म'च्या दिशेने एसीसीची वाटचाल

मुंबई : अदाणी समूहाचा भाग असलेल्या आणि भारतातील विश्वासार्ह बांधकाम साहित्य व सोल्यूशन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या एसीसी लिमिटेडने ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीने सिमेंट विक्रीच्या मिश्रणात सुधारणा, प्रीमियम उत्पादनांच्या विक्रीत वाढ आणि उत्पादन क्षमता विस्ताराच्या माध्यमातून व्यवसायाची गती कायम ठेवली. या तिमाहीत कंपनीची सिमेंट विक्री ९.७२ दशलक्ष टनांवर पोहोचली.

विवो मित्र आणि कुटुंबासोबत जुन्या परंपरांना उजाळा

नवी दिल्ली: विवो इंडियाने आपली नवीन दिवाळी मोहीम, जॉयऑफहोमकमिंग सुरू केली आहे. ही मोहीम दाखवते की, आयुष्य आणि सण बदलत असले तरी, प्रिय कौटुंबिक परंपरा आणि एकत्र घालवलेल्या आठवणी प्रियजनांना कसे जवळ आणतात. डेंटसू क्रिएटिव्ह - वेबचटणी यांच्या सहकार्याने तयार केलेला हा मोहीम चित्रपट, घरापासून दूर राहणाऱ्या एका मुलाची कथा सांगतो, ज्याला आपल्या आईसोबतचा एक विशेष दिवाळी विधी आठवतो, जो त्याला घरी परत येऊन एकत्र सण साजरा करण्याची प्रेरणा देतो. विवोच्या "लिव द जॉय" या तत्त्वज्ञानावर आधारित, ही मोहीम दाखवते की अगदी साध्या परंपरांमध्येही किती खोल भावनिक अर्थ दडलेला असू शकतो आणि त्या घरी परतण्याचा प्रवास खास बनवू शकतात.या मोहीम चित्रपटाचे केंद्रस्थान कबीर आहे, जो दुबईमध्ये राहणारा एक तरुण व्यावसायिक आहे आणि दिवाळीसाठी घरी परत येऊ शकत नाही. छोटी दिवाळीच्या दिवशी, कबीरचे बालपणीचे मित्र त्याच्या आईसाठी एक सरप्राईज सोहळा आयोजित करतात. कबीर आपल्या मित्रांसोबत हे क्षण अनुभवत असताना, त्याच्या लक्षात एक न पेटवलेला दिवा येतो—एक असा दिवा जो तो आणि त्याची आई नेहमी एकत्र पेटवत असत. ही प्रिय परंपरा आठवून, तो आपल्या आईसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी घरी परत येतो. हा चित्रपट कुटुंबातील घट्ट बंध आणि त्यांना एकत्र बांधणाऱ्या परंपरांच्या माध्यमातून #घरीपरतयेण्याचाआनंद जॉयऑफहोमकमिंग दर्शवतो.

बापलेकाची जोडी मराठी रुपेरी पडद्यावर एकत्र

छत्रपती संभाजीनगर - सध्या रुपेरी पडद्यावर कलाकारांची पुढची पिढी मुख्य भूमिकांमध्ये बघायला मिळतेय. राजकारणात किंवा मनोरंजन क्षेत्रात बाप-बेटे एकत्र असणे आता नवं नाही. चित्रपटसृष्टीत बाप-बेटे एकत्रित झळकण्याची परंपरा आहेच. या यादीत एका विशेष जोडीचा समावेश होणार आहे. मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांचा मुलगा सिद्धार्थ सयाजी शिंदे आता मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. 'विष्णूबाळा' या आगामी मराठी चित्रपटातून ही बापलेकाची जोडी मराठी रुपेरी पडद्यावर एकत्र काम करणार आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत सिद्धार्थ सयाजी शिंदे अभिनयाचा 'श्रीगणेशा' करणार आहे.

क्रेडिट कार्डची लिमिट वाढवण्याच्या बहाण्याने व्यापाऱ्याला 70 हजारांचा गंडा!

OTP सांगताच खात्यातून रक्कम गायब; सायबर पोलिसांत तक्रार दाखल

बीड (प्रतिनिधी) बीड शहरासह जिल्ह्यात ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. कधी लॉटरी लागल्याचे, तर कधी केवायसी अपडेट करण्याचे किंवा वाहनावरील ई-चलन तपासण्याचे आमिष दाखवून नागरिकांना ओटीपी देण्यास प्रवृत्त केले जात आहे. अशाच एका प्रकारात बीड शहरातील जालना रोड परिसरातील व्यापाऱ्याला क्रेडिट कार्डची लिमिट वाढवून देण्याचे आमिष दाखवत तब्बल ७० हजार रुपयांचा गंडा घालण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जालना रोड परिसरातील धुप्पड नामक व्यापाऱ्याला एका अनोळखी व्यक्तीचा फोन आला. संबंधित व्यक्तीने क्रेडिट कार्डची लिमिट वाढवून देण्याचे सांगत यासाठी एक ॲप घेण्याची सूचना केली. त्यानंतर आलेला ओटीपी सांगण्यास सांगितले. व्यापाऱ्याने ओटीपी सांगितल्यानंतर त्यांच्या खात्यातून ७० हजार रुपये काढले गेल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे व्यापाऱ्याला आर्थिक फटका बसला. दुप्पट यांच्या क्रेडिट कार्डची लिमिट ७० हजार होती यामुळे तेवढेच पैसे खात्यातून गायब झाले लिमिट जर जास्त असतील तर कदाचित व्यापाऱ्याचे आणखी पैसे जाण्याची शक्यता होती.

घटना लक्षात येताच व्यापाऱ्याने तातडीने बीड येथील सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार अर्ज दिला. तसेच क्रेडिट कार्ड ब्लॉक करण्याची कार्यवाही केली. पुढील आर्थिक व्यवहार रोखण्यासाठी संबंधित बँकेशी संपर्क साधण्याबाबतही प्रयत्न करण्यात आले.

फसवणुकीचे नवनवे फंडे!

सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना जाळ्यात ओढण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या वापरल्या जात आहेत. क्रेडिट कार्डची लिमिट वाढवणे, केवायसी पूर्ण करणे, लॉटरी लागणे, ई-चलनाची माहिती देणे किंवा खाते अपडेट करण्याच्या बहाण्याने ओटीपी मागितला जातो. नागरिकांनी विश्वास ठेवून ओटीपी सांगितल्यास त्यांच्या खात्यातील रक्कम परस्पर काढली जाण्याचा धोका असतो. यापूर्वीही अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे.

सायबर पोलिसांचे आवाहन

नागरिकांनी अनोळखी व्यक्तीला फोनवर किंवा कोणत्याही लिंकद्वारे आलेला ओटीपी सांगू नये. क्रेडिट कार्डची लिमिट वाढवणे किंवा बँकेशी संबंधित कोणत्याही कामासाठी आलेल्या कॉलवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित बँकेच्या अधिकृत क्रमांकावर संपर्क साधून खात्री करावी. अनोळखी लिंक उघडू नये, संशयास्पद ॲप डाउनलोड करू नये आणि बँकिंगविषयक गोपनीय माहिती कोणाशीही शेअर करू नये.

*फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी.** वेळेत तक्रार केल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याच्या प्रयत्नांना मदत होऊ शकते.

ऑनलाइन व्यवहार करताना थोडीशी सावधगिरीही मोठे आर्थिक नुकसान टाळू शकते. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता सतर्क राहणे गरजेचे आहे.

गंगामाऊली'च्या ऊसदराचा तिढा कायम; दोन तासांची बैठक निष्फळ

केज / प्रतिनिधी : उमरी (ता. केज) येथील गंगामाऊली शुगर इंडस्ट्रीज आणि शेतकरी संघटना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये ऊसदरावरून झालेली बैठक निष्फळ ठरली आहे. त्यामुळे गंगामाऊली कारखान्याच्या ऊसदराचा तिढा कायम असून, अंतिम निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

गतवर्षी जाहीर केलेल्या ऊसदराची उर्वरित रक्कम द्यावी आणि २०२६-२७ च्या गळीत हंगामातील उसाचा दर जाहीर करावा, या मागण्यांसाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. या पार्श्वभूमीवर कारखान्याचे संचालक राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि 27) रोजी दोन तास बैठक झाली.

यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे, सतीश शिंदे, अरविंद मोरे, दिलीप लोंढे, प्रमोद जाधव, नाना साखरे, प्रदीप काळे, विनोद धपाटे, सुग्रीव करपे, उमेश गायकवाड, फेरोजखान पठाण, गणेश पवार, विशाल शिंदे, संदीप भाकरे, अमर खाडे आदी आंदोलक शेतकरी व प्रतिनिधी उपस्थित होते.

कारखान्याने यापूर्वी जाहीर केलेली प्रतिटन तीन हजार रुपयांची पहिली उचल आंदोलकांनी अमान्य केली आहे. ऊसदरात आणखी वाढ करून जिल्ह्यातील अन्य साखर कारखान्यांच्या बरोबरीने दर द्यावा, तसेच पहिली उचल विनाकपात द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

गतवर्षीच्या घोषित दराची पूर्तता, चालू हंगामातील अंतिम दर आणि पहिली उचल या मुद्द्यांवर कारखान्याचे चेअरमन व वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय जाहीर केला जाईल, असे आश्वासन संचालक राहुल सोनवणे यांनी दिले. मात्र, बैठकीत कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने ऊसदराचा प्रश्न प्रलंबित आहे. आता पुढील बैठकीत काय निर्णय होतो, याकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्ह्यात 'अमृत दुर्गोत्सव 2026' उपक्रम

शाळा, महाविद्यालये आणि नागरिकांना सहभागाचे आवाहन

बीड दि. 27 (जिमाका) : महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभरात 'अमृत दुर्गोत्सव २०२६' हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राचा समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करणे, छत्रपती शिवाजी महाराजांचे लोककल्याणकारी विचार आणि स्वराज्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे तसेच गड-किल्ल्यांच्या सामरिक व ऐतिहासिक महत्त्वाविषयी जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. . बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात या उपक्रमाची व्यापक व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक पावले उचलली आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी आणि शिक्षण विभागाला पत्राद्वारे आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, शासकीय व अनुदानित शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच संबंधित विभागांनी या उपक्रमात उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग नोंदवावा, यासाठी व्यापक प्रचार-प्रसिद्धी करण्याचे आवाहन माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

दुर्ग निर्मितीच्या परंपरेतून शिवविचारांचा जागर :-

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मातीचे गड-किल्ले तयार करण्याची परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. बदलत्या जीवनशैलीत मुलांचा मोबाईल आणि डिजिटल माध्यमांकडे वाढणारा कल लक्षात घेता, त्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यास आणि मातीशी नाते जोडण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतः किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करताना तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे आणि संरक्षण व्यवस्था यांचा अभ्यास करावा, असे अपेक्षित आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या महान इतिहासाविषयी अभिमानाची भावना विकसित होण्यास मदत होईल.

दुष्काळी परिस्थितीत शिवकालीनजलव्यवस्थापनाची ओळख :-

बीड जिल्ह्यासह राज्यात जाणवणाऱ्यापाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरतो. स्वराज्याच्या उभारणीत रयतेचे हित, शेतीचे संरक्षण आणि उपलब्ध साधनसंपत्तीचे योग्य नियोजन यांना प्राधान्य होते.

विद्यार्थ्यांनी किल्ले तयार करताना किल्ल्यांवरील पाण्याच्या टाक्या, तलाव, पावसाचे पाणी साठविण्याच्या पारंपरिक पद्धती, धान्यसाठा आणि जलव्यवस्थापन या विषयांवर माहिती संकलित करावी. यातून केवळ ऐतिहासिक अभ्यास न होता, विद्यार्थ्यांमध्ये जलसंवर्धन, पाणीबचत आणि पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती निर्माण होणार आहे.

मराठा लष्करी स्थापत्यपरंपरेची दखल घेत युनेस्कोने महाराष्ट्रातील १२ प्रमुख दुर्गांचा जागतिक वारसा यादीत समावेश केला आहे. यामध्ये शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड, लोहगड, साल्हेर, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि जिंजी यांचा समावेश आहे. या जागतिक दर्जाच्या वारशाची माहिती नव्या पिढीला व्हावी आणि दुर्गसंवर्धनाची जाणीव रुजावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा-महाविद्यालये व नागरिकांनी आपल्या परिसरातील सुरक्षित जागी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून दुर्गाची प्रतिकृती तयार करायची आहे. सार्वजनिक रहदारीला अडथळा येणार नाही आणि सुरक्षेच्या नियमांचे पालन होईल, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत नागरिक व विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या दुर्ग प्रतिकृती सोबतचे छायाचित्र (सेल्फी) ५ नोव्हेंबर २०२६ ते २५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत **https:**//www.amrutdurgotsav.com/या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी अर्जासह अपलोड करायचे आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार सहभागींना डिजिटल अभिनंदन पत्र उपलब्ध करून दिले जाईल

लेकीच्या वाढदिवसाला माजी सरपंचांकडून वरपगाव जि प शाळेला सी सी टी व्ही भेट; ॲड बाबुराव देशमुख यांचा पुढाकार

केज दि २८(प्रतिनिधी)

तालुक्यातील वरपगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गावचे माजी सरपंच ॲड बाबुराव विष्णुपंत देशमुख यांनी त्यांची मुलगी राजनंदिनी हिचा वाढदिवस तिच्याच शाळेला सीसीटीव्ही संच भेट देऊन साजरा करण्यात आला. हा स्तुत्य उपक्रम,नवीन पायंडा इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत त्यांनी वाढदिवसाचा सर्व खर्च टाळून शाळेला सीसीटीव्ही कॅमेरा भेट दिला आहे.

शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बोलताना ॲड देशमुख यांनी जिल्हा परिषद शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे भरभरून कौतुक केले. आजच्या काळात इंग्रजी शाळांच्या तुलनेत मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा सरस असून, शाळेत राबवले जाणारे विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत पूरक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास अरुण पंढरीनाथ गालफाडे (पोलीस पाटील) दिलीप पंढरीनाथ देशमुख (चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी) तसेच बालासाहेब सुभाष देशमुख, लक्ष्मण देवकर, बाबासाहेब नरहरी देशमुख, बाळासाहेब प्रकाश देशमुख, बाबासाहेब आबासाहेब देशमुख, अण्णासाहेब देवराव देशमुख, हरिश्चंद्र लिंबनाथ देशमुख, विनायक कापरे, परचंद बनसोडे, सुनील देशमुख, सुदर्शन देशमुख, लक्ष्मण देशमुख, दिलीप देशमुख आणि राजीव खंदारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्रथम व द्वितीय आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दिलीप पंढरीनाथ देशमुख, बाबासाहेब आबासाहेब देशमुख व हरिश्चंद्र देशमुख यांनी स्वतःच्या वतीने विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरव केला.

विभागस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचे यश

राजरत्न कापसेला सुवर्णपदक, तर सोनल कापसेला तृतीय क्रमांकाचे कांस्यपदक

बीड (प्रतिनिधी) : छत्रपती संभाजीनगर येथे मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विभागस्तरीय शालेय किकबॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलच्या राजरत्न कापसे याने सुवर्णपदक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. तसेच सोनल कापसे हिने तृतीय क्रमांकाचे कांस्यपदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत राजरत्न कापसे याने उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्याच्या या यशामुळे त्याची राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलच्या सोनल कापसे हिनेही उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय पारितोषिकासह कांस्यपदक पटकावले. मुलींच्या गटातील स्पर्धा बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली.

याच स्पर्धेत स्कूलचा आणखी एक खेळाडू अर्णव वडमारे यानेही उत्साहाने सहभाग नोंदवत आपले क्रीडाकौशल्य प्रदर्शित केले आणि उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले. या तिन्ही खेळाडूंना क्रीडा शिक्षक मोसिम शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. राजरत्न कापसे याच्या सुवर्णपदकासह राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल आणि सोनल कापसे हिने मिळवलेल्या कांस्यपदकाबद्दल देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे आणि तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

बीड FDA कारवाई ; झमझम शीतपेयावर कारवाई; 1.86 लाखांचा साठा जप्त

बीड — दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांच्या गुणवत्तेशी तडजोड करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कारवाईचा धडाका सुरू केला आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार बीडमध्ये पाबळे नमकीन, हॉटेल मामा काठीयावाडी आणि मे. गोरे बंधू मसाले या प्रतिष्ठानांवर कारवाई केल्यानंतर आता झीम झीम कॉलनीतील मे. झम झम फूड प्रॉडक्ट्स या शीतपेय उत्पादक कारखान्यावर छापा टाकण्यात आला आहे. या कारवाईत 1 लाख 86 हजार 428 रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला असून, कारखान्याचा उत्पादन परवाना निलंबित करण्यात आला आहे.

अस्वच्छ वातावरणात शीतपेयांचे उत्पादन

बीड शहरातील झीम झीम कॉलनी येथे असलेल्या या कारखान्यात अन्न सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचे तपासणीत समोर आले. अन्न व्यवसाय चालक मोमीन शोएबुर्रहमान अतिबुर्रहमान यांच्या कारखान्याची तपासणी केली असता स्वच्छता आणि अन्नसुरक्षेबाबत अनेक त्रुटी आढळल्या.

कारखान्यात वापरण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यात आली नव्हती. कीटक व जंतूंचा प्रवेश रोखण्यासाठी खिडक्यांना संरक्षक जाळ्या नव्हत्या. तसेच रासायनिक स्वच्छता द्रव्ये खाद्यपदार्थांच्या जवळ असुरक्षित पद्धतीने ठेवण्यात आली होती. तपासणीदरम्यान एकूण 88 गुणांपैकी कारखान्याला केवळ 42 गुण मिळाले. त्यामुळे

कारखान्यातील स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या व्यवस्थेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

सात हजारांहून अधिक शीतपेयांच्या बाटल्या जप्त

अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धांत सुनील खांडरे यांच्या पथकाने केलेल्या कारवाईत लेमन, ऑरेंज आणि जिंजर मसाला फ्लेव्हरच्या सात हजारांहून अधिक कार्बोनेटेड शीतपेयांच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याशिवाय साल्व्हो प्रिझर्व्हेटिव्ह, ऑरेंज फ्लेव्हर इमल्शन आणि सायट्रिक ॲसिडचाही साठा जप्त करण्यात आला.

जप्त केलेल्या सर्व साहित्याची एकूण किंमत 1 लाख 86 हजार 428 रुपये आहे. हा साठा पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आला असून, शीतपेयांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. नमुन्यांच्या तपासणीनंतर उत्पादनाच्या गुणवत्तेबाबत पुढील निष्कर्ष स्पष्ट होतील.

परवाना निलंबित; पुढील कारवाईकडे लक्ष

अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन आणि कारखान्यात आढळलेल्या गंभीर त्रुटींच्या पार्श्वभूमीवर उत्पादन परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला आहे. प्रयोगशाळेचा अहवाल आणि प्रशासनाच्या पुढील निर्णयानुसार या प्रकरणात अतिरिक्त कारवाई होण्याची शक्यता आहे.

दिवाळीच्या काळात बाजारात मोठ्या प्रमाणावर खाद्यपदार्थ आणि शीतपेयांची विक्री होत असते. अशा परिस्थितीत उत्पादनाच्या ठिकाणी स्वच्छता राखणे, वापरल्या जाणाऱ्या घटकांची गुणवत्ता तपासणे आणि आवश्यक परवानग्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. बीडमध्ये FDAने सलग केलेल्या कारवायांमुळे अन्नपदार्थ उत्पादक आणि विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रकरणांत प्रशासनाची ही मोहीम पुढेही सुरू राहणार का, याकडे लक्ष लागले आहे. या beed fda karvai ने बीडमधील व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. ही beed fda karvai आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशाने करण्यात आली आहे.

beed fda karvai अंतर्गत आतापर्यंत 4 मोठ्या कारवाया झाल्या आहेत. पाबळे नमकीन, मामा काठीयावाडी, गोरे मसाले आणि आता झम झम फूड. या कारवाईत 42 गुण मिळाले. पाणी तपासणी नाही, जाळी नाही, केमिकल असुरक्षित. म्हणून परवाना निलंबित. दिवाळीत शुद्ध अन्न मिळावे म्हणून ही मोहीम आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

विनम्रसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात भक्तामर विधान

छत्रपती संभाजीनगर : श्री भक्तामर महामंडल विधान व पूजन महोत्सवाच्या सहाव्या दिवशी आचार्य भगवंत श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात विविध धार्मिक अनुष्ठाने भक्तिमय वातावरणात पार पडली. देशमुखनगर येथे चातुर्मास करणाऱ्या आर्यिकारत्न विनयश्री माताजी ससंघ यांचे विधानस्थळी मंगल पदार्पण झाले. त्यांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. यावेळी संजय, सौ. अनिता, सौ. रक्षा व सौरभ पहाडे परिवाराला आचार्यश्रींच्या पादप्रक्षालनाचा, तर मंदाबाई शामलाल पाडे परिवाराला आरतीचा मान मिळाला. प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी यांनी केले. चंद्रसागर धर्मशाळा व वेरूळ क्षेत्राच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. प्रवचनातून आचार्यश्रींनी संयम, विनय, करुणा व आत्मचिंतनाचे महत्त्व सांगत धर्माचरणाचा संदेश दिला.

एमजीएममध्ये 'ग्रीन सिंथेसिस ऑफ सिल्वर नॅनो पार्टिकल्स' पुस्तकाचे प्रकाशन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्सच्या प्राध्यापिका डॉ.रुपाली तौर लिखित 'ग्रीन सिंथेसिस ऑफ सिल्वर नॅनोपार्टिकल्स: प्लांट-बेस्ड अप्रोचेस, कॅरेक्टरायझेशन अँड ॲप्लिकेशन्स' या पुस्तकाचे आज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम विश्वस्त कार्यालय येथे प्रकाशन करण्यात आले. यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर, माजी आमदार किशोर पाटील, क्रेडाईचे उपाध्यक्ष पंजाब तौर, विलासचंद्र कावरा, पंकज नाना बोराडे, डॉ.शिव कदम, डॉ.शंतनु चव्हाण, डॉ.रुपाली तौर व सर्व संबंधित उपस्थित होते. सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.शंतनू चव्हाण हे या पुस्तकाचे सहलेखक आहेत. हरित नॅनोतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनविषयक माहिती या पुस्तकातून मांडण्यात आली आहे.

या पुस्तक एकूण सहा प्रकरणांचा समावेश असून वनस्पतींची पाने, बिया, मुळे, फुले, साल, फळे, फळांची साले आणि मूलद्रव्ये यांसारख्या विविध भागांचा वापर करून चांदीच्या नॅनो कणांचे संश्लेषण करण्याच्या पद्धतींचे विवेचन करण्यात आले आहे. वनस्पतींमध्ये आढळणारी जैवरासायनिक संयुगे नॅनो कणांच्या निर्मितीमध्ये कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात याची शास्त्रीय माहिती पुस्तकात समाविष्ट आहे. हे पुस्तक वनस्पतिशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पदार्थ विज्ञान, हरित रसायनशास्त्र आणि पर्यावरणविज्ञान या क्षेत्रांतील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त संदर्भसाहित्य ठरू शकते. विशेषतः वनस्पतींच्या जैविक क्षमतेचा उपयोग करून शाश्वत आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने या पुस्तकाला महत्त्व आहे. या पुस्तकाचे लेखक डॉ.रुपाली तौर आणि डॉ.शंतनू चव्हाण हे वनस्पतिशास्त्र विषयातील संशोधक असून वनस्पतींच्या अभ्यासासह संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत.

मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा सत्कार

उद्योगपती विवेक देशपांडे यांच्याही हस्ते शाल-श्रीफळ देऊन गौरव

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रसिद्ध उद्योगपती विवेक देशपांडे यांनी शाल व श्रीफळ देऊन मंत्री भोसले यांचा गौरव केला. या वेळी खासदार संदिपान भुमरे, माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) राजेंद्र साबळे पाटील, उद्योगपती राम भोगले, स्थायी समिती सभापती अनिल मकरिया, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष (पूर्व) सुरेश बनकर आणि ग्रामीण जिल्हाध्यक्ष (पश्चिम) संजय खंबायते यांची उपस्थिती होती. राजकीय, प्रशासकीय आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला.

जाहिर प्रगटन

मा. एन.आर. ढोके साहेब प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड, यांचे न्यायालयात.

फि.एम.ए.नं. ३४८/२०२६ पुढील तारीख २३/११/२०२६

अर्जदार : शरद पि. सुधाकर सोनवणे वय २० वर्ष धंदा शिक्षण रा. निंभोरा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार - ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय निंभोरा ता कन्नड जि. औरंगाबाद.

[illegible]

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटन द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदाराचा जन्म नोंद होणे बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात जन्म नोंद प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहिर प्रगटन द्वारे वरील जन्म नोंद प्रमाणपत्र देण्यापूर्वी इतर कुणासही उजर/आक्षेप असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासुन तीस (३०) दिवसांच्या आत या मा. न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीलामार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीस आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या मुलीचे नावे जन्म नोंद प्रमाणपत्र देण्यात येईल, सवय आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझे सहिनीशी व मा. कोर्टचे शिक्यानुसार दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब

जाहिर प्रगटन

मा. एन. आर. ढोके साहेब दिवाणी न्यायाधीश, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.

दि.कि. अर्ज नं. ४२६/२०२६ पुढील तारीख १६/११/२०२६

[illegible]

... हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सबब आज दिनांक

२८/१०/२०२६ रोजी माझे सहिनीशी व मा. कोर्टाचे शिक्यानुसार दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कन्नड,

जाहिर प्रगटन

मा. एन.ए.शेख साहेब दिवाणी न्यायाधीश, कन्नड, यांचे न्यायालयात.

कि.एम.ए.नं. ३६१/२०२६ पुढील तारीख ०१/११/२०२६

[illegible]

आत या मा. न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर बकोलामार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीस आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या नावे जन्म नोंद प्रमाणपत्र देण्यात येईल, सबब आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझे सहिनीशी व मा. कोर्टचे शिक्यानुसार दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब

जाहिर प्रगटन

मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.

पुढील तारीख : २८/०४/२०२६
दि.कि.अर्ज क्र. १२३/२०२६

अर्जदार : 1. दत्तात्रय एकनाथ वाघ, वयः ६२ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. 2. दादाराव एकनाथ वाघ, वयः ५९ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. 3. लिलाबाई शेकुजी बिडवे, वयः ६५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हतनूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. 4. सुलोचनाबाई काशिनाथ बिडवे, वयः ५० वर्षे, धंदाः घरकाम, रा. रायगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक / निल

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे एकनाथ धोंडीबा वाघ हे दि. ३०/०५/१९९९ रोजी मौजे करंजखेड, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत एकनाथ धोंडीबा वाघ यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २७/०३/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

मा.श्री.एन.आर. ढोके साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.

दि.कि. अर्ज क्रमांक ३२१ / २०२६ पुढील तारीख ०५/११/ २०२६

अर्जदार : अब्दुल समद शेख, वय- ४२ वर्ष, धंदा-शेती रा. करंजखेडा ता. कन्नड, जि.छ.संभाजीनगर, (औरंगाबाद)

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामविकास आधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय करंजखेडा ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर. (औरंगाबाद)

अर्ज : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे ॲड.टी.डी. शिंदे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे मौजे करंजखेडा ता. कन्नड येथील रहिवासी असुन अर्जदाराचा मुलगा नामे शेख हुजेफ अब्दुल चा जन्म हा मौजे करंजखेडा ता. कन्नड येथे अर्जदाराच्या राहत्या घरी दिनांक १५/०५/२०१२ रोजी झालेला आहे. अर्जदार हे अडाणी असल्यामुळे व त्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे त्यांनी अर्जदाराच्या मुलाची जन्माची नोंद ही ग्रामपंचायत करंजखेडा कार्यालय तसेच इतर कोठेही केलेली नाही.

हे की, अर्जदार व त्यांच्या घरच्यांना शासकीय व निमशासकीय व शालीय कामाकरिता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी ग्रामपंचायत कार्यालय करंजखेडा येथे जन्म प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी अर्जदाराची जन्म नोंद ही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगुन तसे जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिले करिता दिनांक ११/०८/२०२६ रोजी अर्जास कारण घडले.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (३०) दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे त्याच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/१०/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

मा.श्री.एन.आर. ढोके साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.

दि. कि. अर्ज क्रमांक: ३२०/ २०२६ पुढील तारीख ०५/११/२०२६

अर्जदार : १) : अब्दुल समद शेख, वय- ४२ वर्ष, धंदा-शेती रा. करंजखेडा ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर. (औरंगाबाद)

विरुध्द

गैरअर्जदार: ग्रामविकास आधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय करंजखेडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. (औरंगाबाद)

अर्ज : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.

'जीसीसी' म्हणजे केवळ एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचे बॅक-ऑफिस नव्हे. सुरुवातीला वित्त, मानव संसाधन किंवा ग्राहक सेवा यांसारख्या सेवा देणाऱ्या केंद्रांपासून आज 'जीसीसी'चा प्रवास कृत्रिम बुद्धिमत्ता, 'डेटा सायन्स', सायबर सुरक्षा, सेमीकंडक्टर, 'रोबोटिक्स', 'क्लाऊड काँप्युटिंग', संशोधन आणि प्रगत अभियांत्रिकीपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे 'जीसीसी'ची वाढ म्हणजे उच्च कौशल्याच्या रोजगाराची वाढ. याच कारणामुळे महाराष्ट्राच्या पुढील औद्योगिक धोरणात 'जीसीसीं'कडे केवळ 'नोकऱ्या निर्माण करणाऱ्या कंपन्या' म्हणून न पाहता ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेची केंद्रे म्हणून पाहण्याची गरज आहे. पुण्याने गेल्या काही दशकांमध्ये याबाबत एक उत्तम उदाहरण निर्माण केले आहे. शिक्षणसंस्थांचे जाळे, अभियांत्रिकी महाविद्यालये, ऑटोमोबाईल उद्योग, माहिती-तंत्रज्ञान कंपन्या, संशोधन संस्था आणि तुलनेने चांगले जीवनमान यामुळे पुणे हे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले; मात्र पुण्यावरच सततचा भार टाकणे ही भविष्यातील शहाणपणाची रणनीती ठरणार नाही. वाढती वाहतूक, महागडी जमीन, वाढता घरबांधणी खर्च, पाणी आणि पर्यावरणीय ताण यांसारख्या समस्या पुण्याच्या विस्ताराला मर्यादा घालू शकतात. म्हणूनच पुण्याने तयार केलेली परिसंस्था इतर शहरांमध्ये प्रतिकृतीच्या स्वरूपात नव्हे, तर स्थानिक सामर्थ्यानुसार विकसित करणे आवश्यक आहे.

नाशिकला कृषी-तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया, उत्पादन अभियांत्रिकी आणि डिझाईन क्षेत्रात संधी निर्माण करता येतील. नागपूरला लॉजिस्टिक्स, संरक्षण-तंत्रज्ञान, 'एरोस्पेस', 'डेटा सेंटर' आणि विदर्भाशी संबंधित तंत्रज्ञान सेवांचे केंद्र बनवता येऊ शकते. छत्रपती संभाजीनगरला ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, प्रगत उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्रात मोठी संधी आहे. प्रत्येक शहराने आपली स्वतंत्र तंत्रज्ञान ओळख निर्माण करणे गरजेचे आहे. चार लाख रोजगारांचे लक्ष्य ऐकायला आकर्षक आहे; परंतु रोजगाराची संख्या वाढवण्याबरोबर त्याची गुणवत्ता हा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे. आजच्या उद्योगाला पारंपरिक पदवीधरांपेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता, 'मशीन लर्निंग', डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा, सेमीकंडक्टर डिझाईन, क्लाऊड तंत्रज्ञान आणि प्रगत उत्पादन तंत्रज्ञानाचे ज्ञान असलेले मनुष्यबळ हवे आहे. येथेच सरकार, उद्योग आणि विद्यापीठांची खरी कसोटी लागणार आहे. महाराष्ट्रात 'आयआयटी', 'आयआयएसईआर', विविध विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि संशोधन संस्थांचा पाया मोठा आहे; परंतु उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्र यांच्यातील दुवा अद्याप पुरेसा मजबूत झालेला नाही. 'जीसीसी'च्या माध्यमातून हा दुवा मजबूत करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना केवळ कार्यालयीन जागा देण्याऐवजी संशोधन प्रयोगशाळा, संयुक्त संशोधन केंद्रे, पेटंट विकास, विद्यापीठांबरोबर प्रकल्प आणि स्टार्टअप सहकार्य यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळे महाराष्ट्रात येणारी गुंतवणूक केवळ पगार आणि कार्यालयांपुरती मर्यादित राहणार नाही. त्यातून ज्ञान, पेटंट, तंत्रज्ञान आणि स्थानिक उद्योजकता निर्माण होईल. महाराष्ट्रापुढील सर्वांत मोठा धोका म्हणजे आर्थिक विकासाची असमान भौगोलिक रचना. मुंबई आणि पुणे समृद्ध होत असताना राज्यातील इतर भागातील तरुणांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. नाशिक, नागपूर किंवा छत्रपती संभाजीनगरमध्ये उच्च कौशल्याच्या नोकऱ्या निर्माण झाल्या, तर हा प्रवाह उलटू शकतो. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील तरुणांना त्यांच्या शहरातच चांगल्या संधी मिळाल्यास केवळ स्थलांतर कमी होणार नाही, तर स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळेल. आज पुण्यात दिसणाऱ्या वाहतूक आणि नागरी नियोजनाच्या समस्या उद्या नाशिक, नागपूर किंवा छत्रपती संभाजीनगरमध्ये निर्माण होऊ नयेत. नव्या शहरांचा विकास 'पहिले उद्योग, नंतर सुविधा' असा नसून 'उद्योग आणि सुविधा एकत्र' असा असायला हवा. 'जीसीसी'मध्ये गुंतवणूक आली आणि नोकऱ्या निर्माण झाल्या; पण त्या नोकऱ्या स्थानिक तरुणांना मिळाल्या नाहीत, तर या संपूर्ण धोरणाचा सामाजिक फायदा मर्यादित राहील. त्यामुळे प्रत्येक नव्या 'जीसीसी' केंद्रासाठी स्थानिक कौशल्य विकासाचे स्पष्ट उद्दिष्ट असावे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडणे, अंतिम वर्षापासून प्रशिक्षण देणे, महिलांसाठी लवचीक रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल प्रशिक्षण देणे या बाबी महत्त्वाच्या ठरतील. किती कंपन्या आल्या, किती रोजगार निर्माण झाले, त्यातील किती उच्च कौशल्याच्या नोकऱ्या आहेत, किती स्थानिक तरुणांना संधी मिळाली, किती संशोधन प्रकल्प सुरू झाले, किती पेटंट मिळाले, किती स्टार्टअपना या परिसंस्थेचा फायदा झाला या प्रश्नांची उत्तरे सरकारने नियमितपणे जनतेसमोर ठेवली पाहिजेत. त्यासाठी जिल्हा आणि शहरनिहाय लक्ष्य निश्चित करून आढावा घेणे आवश्यक आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

वेध

नीलेश जोशी

वाचाल तर वाचाल

नुकताच वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त १५ ऑक्टोबर रोजी हा दिवस साजरा करण्यात येतो. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने या दिवसानिमित्त विविध कार्यक्रम, उपक्रमांची योजना केली जाते. खरं म्हणजे 'वाचाल तर वाचाल' ही म्हण आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. मात्र, सद्यःस्थितीत बाल, किशोर आणि तरुण विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तकांपेक्षा मोबाईल अधिक दिसतो. इंटरनेट आणि विविध ॲप त्यातही चॅटजीपीटीसारख्या माध्यमातून आता कोणतीही माहिती काही सेकंदांत मिळते, कुठल्याही प्रश्नांची उत्तरे चुटकीसरसी उपलब्ध होतात. ही प्रगती उपयोगी असली तरी सहज मिळणाऱ्या माहितीचा अर्थ समजून घेण्याची आणि त्यावर स्वतः विचार करण्याची सवय मुलांमध्ये विकसित होत आहे का? हा खरा प्रश्न आहे.



वास्तविक पुस्तक वाचनातून मिळणारे ज्ञान, वाचनानंतर सहज घडणारी विचार प्रक्रिया, एखाद्या घटनेमागचे कारण शोधण्याची वृत्ती, दोन विविध मतांची तुलना करण्याची क्षमता आणि वाचलेल्या माहिती संदर्भात प्रश्न विचारण्याची सवय कमी होत आहे का? ही चिंता अनेक शिक्षणतज्ज्ञांना आहे. आजच्या मुलांचे जग स्क्रीनभोवती फिरते. मोबाईल, टॅब, व्हिडीओ, गेम्स आणि समाजमाध्यमांवरील विविधांगी मजकूर यामुळे माहितीचा अखंड प्रवाह त्यांच्या हातात आला आहे. या सुविधांचे फायदे नाकारता येणार नाहीत. शैक्षणिक व्हिडीओ, डिजिटल पुस्तके आणि ऑनलाईन संदर्भसाहित्यामुळे ज्ञान मिळवण्याच्या संधी वाढल्या आहेत, हेही खरेच. मात्र, तत्काळ मनोरंजन आणि सतत बदलणाऱ्या दृश्यांची (स्क्रॉलिंग) सवय विद्यार्थ्यांमध्ये वाचनामुळे विकसित होणाऱ्या एकाग्रतेत अडचण निर्माण करते आहे का हा देखील प्रश्न आहे.

जगात विविध देशांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाचनकौशल्याबाबत चिंतन सुरू आहे. आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मूल्यमापन कार्यक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत गत वर्षी म्हणजेच २०२५ साली करण्यात आलेले सर्वेक्षण यावर्षी सप्टेंबर महिन्यात जाहीर करण्यात आले. विविध देशांमध्ये १५ वर्ष वयोगटातील सुमारे ७.५० लक्ष विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणातून समोर आलेल्या निष्कर्षानुसार विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाचनाची सवय कमी होत असल्याचे म्हटले आहे. यात मुख्यतः डिजिटल माध्यमांचा अतिरेकी वापर कारणीभूत असल्याचे मत नोंदविण्यात आले. या सर्वेक्षणात भारताचा समावेश नसला तरी सभोवताली पाहताना कमी-अधिक प्रमाणात अशाच पद्धतीची स्थिती असल्याचे दिसून येते.

डिजिटल युगात मुलांना माहितीची कमतरता नाही; उलट, माहितीचा अतिरेक आहे. खरी अडचण आहे ती योग्य माहिती निवडण्याची. समाजमाध्यमांवर एखादी गोष्ट वारंवार दिसली म्हणजे ती सत्य ठरत नाही. मजकूर शांतपणे वाचण्याची, संदर्भ तपासण्याची आणि पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची सवय नसेल, तर चुकीची माहिती स्वीकारण्याचा धोका वाढतो. उद्याच्या नागरिकांना तंत्रज्ञान वापरण्याचे कौशल्य जितके आवश्यक आहे, तितकीच त्यामागील माहितीचे चिकित्सक मूल्यमापन करण्याची क्षमताही आवश्यक आहे. पण वाचनाचा आणि चिंतनाचा अभाव असल्यास अडचण निर्माण होते. एखादा प्रश्न समजून घेण्याऐवजी तयार उत्तरावर अवलंबून राहणे, कठीण मजकूर वाचण्याऐवजी त्याचा थोडक्यात सारांश शोधणे आणि स्वतः विचार करण्याऐवजी इतरांचे मत स्वीकारणे, प्रत्येक गोष्टीचे उत्तर तत्काळ मिळालेच पाहिजे, अशी अपेक्षा करणे हे धोकादायक लक्षणे आहेत. यासाठी केवळ मुलांना किंवा मोबाईलला दोष देऊन चालणार नाही. मुलांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना वाचनाची शिकवण देणे, स्वतः दिवसभर स्क्रीनमध्ये गुंतून राहून त्यांच्याकडून पुस्तक वाचनाची अपेक्षा करणे, हा मोठा विरोधाभासच नव्हे का? घरात वाचनाला स्थान नसेल, पालक मुलांशी पुस्तकांबद्दल चर्चा करत नसतील आणि शाळेत वाचन म्हणजे केवळ परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे साधन बनले असेल, तर मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होणार तरी कशी? हा खरा प्रश्न आहे. दरवर्षी वाचन प्रेरणा दिन हा दिवस आपण विविध कार्यक्रम, उपक्रम घेत साजरा करीत असताना पुढच्या पिढीत वाचन संस्कृती वाढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील एवढेच. ■

९४२२८६२४८४

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

दुर्गा अर्गला स्तोत्रम्

शारदीय नवरात्रात महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, त्रिगुणात्मिका जगदंबेची आराधना शक्ती उपासक भक्तिभावाने करतात. अनेक देवीभक्त कठोर साधना या कालावधीत करतात. या कठोर साधनेत सप्तशतीचे पाठ अग्रक्रमावर आहेत. सप्तशतीच्या पाठाचा प्रारंभ कवच, अर्गला आणि किलक स्तोत्राने केला जातो.

त्यातील कवच संरक्षक म्हणून कार्य करते तर अर्गला स्तोत्र अडथळे दूर करते. आपल्या जीवनात पदोपदी अडथळे असतात. ते दूर करून आपला मार्ग प्रशस्त करण्यासाठी दुर्गा अर्गला स्तोत्र उत्तम उपाय आहे. घरात बसून संरक्षण हे महत्त्वाचेच पण उत्तुंग भरारी घेण्यासाठी दरवाजे उघडून बाहेर झेप घ्यावी लागते. त्यासाठी अर्गला महत्त्वाची. आज आपण अर्गला स्तोत्राबाबत विचार करू. संस्कृतात अर्गला म्हणजे जुन्या काळी दरवाजा बंद केल्यावर त्याला मोठी लाकडाची बल्ली जिला आगळ म्हणतात ती लावत असत. तिच्यामुळे दरवाजा बाहेरून कितीही उघडण्याचा प्रयत्न केला तरी तो उघडत नसे. त्या लाकडाला आगळ म्हणजे अर्गल म्हणतात. आताच्या भाषेत दरवाज्याचा कडी कोंडा म्हणजे अर्गल होईल. ही अर्गल दूर होईपर्यंत दरवाजा उघडत नाही.

थोडक्यात अर्गल दूर करणे म्हणजे अडथळा दूर करणे. कडी काढून दरवाजा उघडून मार्ग मोकळा करणे.

अर्गला स्तोत्र हे दुर्गेचे अक्षर रूप आहे. हे असे रूप जे आपल्या जीवनातील अवरोध हटवते. मार्कंडेय ऋषींनी आपल्याजवळ अर्गला स्तोत्राच्या रूपाने सप्तशती पाठाची आणि त्या निमित्ताने सुख शांतीची चावीच दिली आहे. अर्गला स्तोत्रातील मंत्र अत्यंत प्रासादिक आहेत.

ॐ जयन्ती मङ्गला काली भद्रकाली कपालिनी ।
दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तु ते ।।

हा सिद्धमंत्र अर्गला स्तोत्राने दिला आहे.

याच स्तोत्रात असलेला अत्यंत सिद्ध मंत्र पुढे दिला आहे. हा मंत्र अर्गला स्तोत्रातील प्रत्येक मंत्राचा भाग आहे.

रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

या मंत्राद्वारे उपयोगी पसायदान तिला मागितले आहे.

अर्गला स्तोत्रात बहुतेक श्लोक अनुष्टुप छंदात असून त्या त्रिगुणात्मिका महालक्ष्मीला प्रत्येक श्लोकातून रूप, विजय, यश, कीर्ती मागितली आहे.

त्या चामुंडेचा जय जयकार करून सर्वांचे दुःख हरण करणाऱ्या कालरात्री स्वरूपाला वंदन केले आहे.

मधुकैटभविध्वंसि विधातृवरदे नमः .
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

मधु आणि कैटभ या राक्षसांचा वध करणारी, ब्रह्मदेवांना वरदान देणाऱ्या जगदंबे आम्हाला रूप, यश, विजय दे.

महिषासुरनिर्नाशि भक्तानां सुखदे नमः ।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

महिषासुराचा नाश करणारी आणि भक्तांना सुख प्रदान करणाऱ्या चामुंडे आम्हाला रूप, विजय, यश दे. आमच्या शत्रूंचा पराजय कर.

धूम्रनेत्रवधे देवि धर्मकामार्थदायिनि ।।
किंवा
रक्तबीजवधे देवि चण्डमुण्डविनाशिनि ।
किंवा
निशुम्भशुम्भनिर्नाशि त्रिलोक्यशुभदे नम ।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

धूम्रनेत्र नावाच्या राक्षसाचा वध करणारी, रक्तबीज नावाचा राक्षसाचा, चंड आणि मुंड राक्षसांचा वध करणारी, शुंभ आणि निशुंभाचा वध करणाऱ्या त्या चामुंडेला रूप, जय, यश देण्यासाठी आणि शत्रूंचा निःपात करण्यासाठी प्रार्थना करण्यात आली आहे. शक्तिरूपा चंडिकेला साष्टांग दंडवत घातले आहे.

आणि स्तुती करताना हे देवी तुझे रूप आणि तुझे चरित्र अकल्पनीय आहे असे म्हटले आहे. तू शत्रूंचा विनाश करणारी, माझी सर्व पापे दूर करणारी आहे. तुझ्या चरणावर मी नतमस्तक होतो.

सर्व रोगांचा नाश करणाऱ्या चंडिके मला यश, जय दे, रूप दे.

देहि सौभाग्यमारोग्यं देहि देवि परं सुखम् ।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

हे पापनाशिनी चंडीके! मला सौभाग्य, आरोग्य आणि परम् सुख दे. सौभाग्य प्राप्तीसाठी हा मंत्र म्हणावा.

हे देवी! माझे कल्याण कर, मला ऐश्वर्य प्रदान कर. जे माझा तिरस्कार करतात त्यांचा नाश कर!

विद्यावन्तं यशस्वन्तं लक्ष्मीवन्तञ्च मां कुरु ।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

हे देवी! तुझ्या भक्तांची मेधा शक्ती जागृत करून त्यांना विद्यावंत कर, यशवंत आणि लक्ष्मीवंत कर! विद्यार्थ्यांना परीक्षेत स्मरणशक्तीसाठी हा मंत्र म्हणावा.

हे दुर्गे! मोठमोठ्या अक्राळविक्राळ राक्षसांना मारणारी तू आमचेही अशा दुष्ट राक्षसांपासून रक्षण कर.

हे देवी! ब्रह्मा, विष्णू आणि महेश तुझी स्तुती करतात. शचि आणि इंद्र तुझी पूजा करतात.

पत्नीं मनोरमां देहि मनोवृत्तानुसारिणीम् ।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।

हे चामुंडे! माझ्या स्थितीशी जुळवून घेणारी आणि दुर्गम अशा जगातून सुटण्यास सक्षम असणारी मनोरमा पत्नी मला मिळू दे! ज्यांची लग्न होत नाहीत त्यांनी हा मंत्र जपावा.

अर्गला स्तोत्रात त्या महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती त्रिगुणात्मिका जगदंबेला माझ्या जीवनात असलेले अडथळे दूर करून सर्व मार्ग खुले करण्याची प्रार्थना आहे.

इदं स्तोत्रं पठित्वा तु महास्तोत्रं पठेन्नरः ।
सप्तशतीं समाराध्य वरमाप्नोति दुर्लभम् ।

सप्तशती पाठापूर्वी जर अर्गला स्तोत्राचा पाठ केला तर त्या साधकाला सप्तशतीचे पुण्यफळ प्राप्त होतेच पण दुर्लभ असे वर त्याला प्राप्त होतात.

अर्गला स्तोत्रातील विविध मंत्र सिद्धमंत्राचे काम करतात. ज्यांना रोग व्याधी झाली त्यांच्यासाठी श्लोकमंत्र या स्तोत्रात आहे. विद्यार्थ्यांनी विद्या यावी म्हणून, सोज्वळ पत्नी मिळावी म्हणून, शत्रूंचा नाश व्हावा म्हणून या स्तोत्रात सिद्ध श्लोकमंत्र दिले आहे.

दुर्गा कवच संरक्षण करते तर अर्गला स्तोत्र अडथळे दूर करून मार्ग खुला करते. म्हणून अर्गला स्तोत्राचा पाठ मार्गसोपान आहे. ■

९८२२२६२७३५

दुष्काळात गोवंशाचे रक्षण करणे आपले कर्तव्य!



सध्या देशात दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली आहे. पाण्याअभावी शेतात पिके नाहीत, तर चारा आणि पाण्याअभावी जनावरे, गायी तडफडत आहेत. अशातच अहिल्यानगर जिल्ह्यातील इसळक येथील 'निसर्गसृष्टी गोपालन संस्थे'त अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. दुष्काळाच्या भीषण झळांमुळे काही शेतकऱ्यांनी आपल्या काळजाचा तुकडा असलेल्या गोवंशाला गोपालन संस्थेच्या स्वाधीन केले आहे. 'आम्हाला आता जनावरे सांभाळणे शक्य नाही, तुम्हीच त्यांना वाचवा', अशी विनवणी करत शेतकरी गोशाळांकडे धाव घेत आहेत. पाण्याचा अभाव, चाऱ्याची टंचाई आणि वाढता आर्थिक भार यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र, या संकटातून मार्ग काढताना गोमातेला वाऱ्यावर सोडणे योग्य नाही. जसे आपण कुटुंबातील वृद्ध अथवा आजारी सदस्याला पैशांअभावी घराबाहेर काढत नाही, तसेच गोमाताही आपल्या कुटुंबाचा अविभाज्य घटकच आहे.

त्याकरिता संपूर्ण गावाने एकत्र येऊन गावशिवारातील उपलब्ध पाणी आणि चारा यांचे समन्यायी वाटप केल्यास या समस्येची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते. ज्यांना शक्य आहे, त्यांनी गोवंशासाठी पिण्याचे पाणी विनामूल्य अथवा नाममात्र दरात उपलब्ध करून द्यावे. गोवंशाचे रक्षण आणि संगोपन करणे ही शासनाचीही जबाबदारी आहे. शासनाने तातडीने चारा छावण्या, पाण्याची व्यवस्था आणि गोवंशासाठी निवारा केंद्रे सुरू करायला हवी. निराधार गोवंशाचे पुनर्वसन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारायला हवी. गोवंश संगोपनासाठी शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य आणि चारा उपलब्ध करून द्यावा. दुसरीकडे, शेतकऱ्यांनीही संकटाच्या काळात गोमातेचे रक्षण करण्याचा प्रण केला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने गोमातेप्रति असलेले आपले कर्तव्य ओळखून कृती करण्याची हीच वेळ आहे, हे ध्यानात घ्यायला हवे.

गोमाता म्हणजे राष्ट्राच्या समृद्धतेचे प्रतीक आहे. त्यामुळे दुष्काळाच्या कठीण काळात गोवंशीयांना वाऱ्यावर सोडणे हा अपराध आपल्याकडून होणार नाही याची काळजी घेऊ या. 'आपण गोमातेचे रक्षण केले, तरच गोमाता या संकटातून राष्ट्राचे रक्षण करेल', हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

डॉ. स्वाती देशमुख/नागपूर

■■■

वाचक पत्रे

नवीन भुसावळ-नागपूर आंतरशहरी रेल्वे सुरू करा

कोविड-१९ महामारीच्या काळात बंद करण्यात आलेली नागपूर-भुसावळ-नागपूर प्रवासी रेल्वे अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे हजारो प्रवाशांची गैरसोय होत आहे. जर रेल्वे सध्याची प्रवासी रेल्वे पुन्हा सुरू करू शकत नसेल, तर तिच्या जागी एक नवीन आंतरशहरी एक्सप्रेस सुरू केली पाहिजे. ही रेल्वे विदर्भ आणि खान्देशची जीवनरेखा आहे. अकोला, वर्धा, बडनेरा, शेगाव, मलकापूर आणि जळगाव येथील विद्यार्थी, कर्मचारी, व्यावसायिक आणि मजूर दररोज या मार्गावरून प्रवास करतात. प्रवासी रेल्वे बंद असल्याने त्यांना महागड्या बस आणि एक्सप्रेस गाड्यांवर अवलंबून राहावे लागत आहे.

नागपूर ते भुसावळ सकाळी ६ वाजता आणि भुसावळ ते नागपूर सायंकाळी ४.३० वाजता जनरल आणि चेअर कारसह आंतरशहरी रेल्वे चालवण्याचा प्रस्ताव आहे. रेल्वे वंदे भारतसारख्या प्रीमियम गाड्या चालवते, परंतु सामान्य प्रवाशासाठी एक परवडणारी दैनंदिन रेल्वे देखील आवश्यक आहे. रेल्वेने यावर तत्काळ निर्णय घ्यावा, ही विनंती.

राजेश कारिया/अकोला

■■■

जनताच करेल झुरळ आणि कीटकांचा नायनाट

लहानपणी शाळेत 'कीटकांची सभा' म्हणून एक धडा होता. यात सर्व कीटक सभेमध्ये येऊन आपले उपद्रवमूल्य किती व ते कोणकोणते आजार पसरवू शकतात याची माहिती देतात. या सर्वांचा समान शत्रू म्हणजे स्वच्छता. गेल्या काही महिन्यांपासून भारतात जे आंदोलन सुरू आहे ते बघितले की त्या धड्याची आठवण होते. इथे झुरळोपंत लांबशिंगें यांनी आंदोलन उभारले आणि या आंदोलनात गोचीडभाऊ चिकटे, डासोपंत गुणगुणे, चापटराव ढेकणे, पिसू टुणटुणे, माशीबाई दुपंखे, उबाई डोके इत्यादी सर्व कीटक मंडळी देशाचे वातावरण आपल्या उपद्रवी वृत्तीने नासवायला एकत्र आलीत. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वछता अभियान सुरू केल्याने या कीटकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी व आम्ही किती घातक होऊ शकतो हे दाखविण्यासाठी त्यांनी हे सर्व सुरू केले आहे. आता देशातील जनतेनेच उत्स्फूर्तपणे स्वच्छता मोहीम राबवून कीटकांचा नायनाट करून वातावरण शुद्ध करण्याची वेळ आली आहे. ■

मोहन पांडे/नागपूर

■■■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

कृषी उत्पादन

भारतात अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन २०२५-२६

शाश्वत अन्नसुरक्षेची सुनिश्चिती

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या 'तिसऱ्या आगाऊ अंदाजानुसार' २०२५-२६ मध्ये भारताच्या कृषी क्षेत्राने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या काळात अन्नधान्याचे उत्पादन ३७६.५६ दशलक्ष टन इतके झाले आहे, जी देशातील आतापर्यंतची सर्वोच्च पातळी आहे. २०२४-२५ मधील ३५७.७३ दशलक्ष टन उत्पादनाच्या तुलनेत ही सुमारे १८.८३ दशलक्ष टन किंवा ५.३ टक्क्यांची वाढ आहे. विशेष म्हणजे, २०२३-२४ मधील ३३२.३० दशलक्ष टन उत्पादनानंतर २०२४-२५ हे वर्षही उत्पादनाच्या दृष्टीने विक्रमी ठरले आहे. ही सलग वाढ भारताच्या कृषी उत्पादन क्षमतेचा निरंतर विस्तार दर्शवते.

या कामगिरीचे महत्त्व केवळ कृषी उत्पादनापुरते मर्यादित नसून, अन्नधान्याचे अधिक उत्पादन करून भारताची अन्न उपलब्धता सुनिश्चित करणे, राखीव साठा राखणे, सार्वजनिक वितरण प्रणालीला बळकट करणे, अन्न पुरवठा स्थिर ठेवणे, बाजारातील चढ-उतारांचा सामना करणे तसेच राष्ट्रीय आर्थिक लवचिकता सुधारण्याची क्षमता वाढवणे ही आहे. रोजगार आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठीही कृषी आणि संबंधित उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत.

तथापि, आता मुख्य प्रश्न केवळ भारत पुरेसे अन्नधान्य पिकवू शकतो का, एवढाच उरलेला नसून, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, या विक्रमी उत्पादनाचे रूपांतर शाश्वत अन्न आणि पोषण सुरक्षेत करता येईल का? ज्यात शेतकऱ्यांचे पुरेसे उत्पन्न सुनिश्चित करून जमीन, पाणी व इतर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल.

गेल्या दशकात भारताच्या अन्नधान्य उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे; २०१५-१६ मधील २५१.५४ दशलक्ष टन वरून हे उत्पादन २०२५-२६ मध्ये ३७६.५६ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले आहे. या कालावधीत उत्पादनात सुमारे १२५ दशलक्ष टनांची वाढ

कृषी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण टप्पा

तक्ता १: भारताचे अन्नधान्य उत्पादन

कृषी वर्ष	अन्नधान्य उत्पादन (दशलक्ष टन)
२०१५	१६,२५१.५४
२०२०	२१,३१०.७४
२०२२	२३,३२९.६९
२०२३	२४,३३२.३०
२०२४	२५,३५७.७३
२०२५	२६,३७६.५६

झाली. २०२४-२५ ते २०२५-२६ या कालावधीत झालेली १८.८३ दशलक्ष टनांची वाढ हे दर्शवते की, उत्पादनातील ही सध्याची वाढ केवळ एखाद्या खराब कृषी वर्षानंतर झालेली सावरण्याची प्रक्रिया नसून, ती भारताच्या दीर्घकालीन उत्पादन वाढीचाच एक भाग आहे.

टीप: २०२५-२६ मधील उत्पादनाचा आकडा हा 'तिसरा आगाऊ अंदाज' आहे आणि पुढील अधिकृत अंदाजांमध्ये त्यात सुधारणा होऊ शकते.

अन्नधान्य उत्पादनाची रचना

२०२५-२६ चे विक्रमी उत्पादन सर्वसमावेशक स्वरूपाचे असून, त्यात विशेषतः तांदूळ, गहू आणि मका यांच्या दमदार कामगिरीचे प्रतिबिंब तक्ता २ वरून दिसून येते. यात मक्याचे उत्पादन सर्वाधिक म्हणजे ३७१ टक्क्यांहून जास्त वाढले आहे.

तक्ता २: प्रमुख अन्नधान्य पिके, २०२५-२६

पीक	२०२४-२५	२०२५-२६	वाढ	टक्केवारीतील बदल
एकूण अन्नधान्य	३५७.७३ MT	३७६.५६ MT	१८.८३ MT	५.२६%
तांदूळ	१५०.१८ MT	१५४.०२ MT	३.८४ MT	२.५६%
गहू	११७.९४ MT	१२०.६६ MT	२.७२ MT	२.३१%
मका	४३.४० MT	५५.०९ MT	११.६९ MT	२६.९३%

तांदूळ आणि गहू यांचे एकत्रित उत्पादन सुमारे २७४.६८ दशलक्ष टन इतके आहे, जे एकूण अन्नधान्य उत्पादनाच्या जवळपास ७३ टक्के आहे. यावरून भारताच्या अन्नसुरक्षा व्यवस्थेत तृणधान्यांचे असलेले निरंतर महत्त्व अधोरेखित होते, तसेच पिकांच्या अधिक वैविध्यकरणाची गरजही यातून दिसून येते.

स्रोत: तिसरे आगाऊ अंदाज, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, मे २०२६

जागतिक अन्नधान्य उत्पादनातील भारताचे स्थान

तक्ता ३: जागतिक अन्नधान्य उत्पादनात भारताचा सूचक वाटा, २०२५-२६

वस्तू	भारताचे उत्पादन २०२५-२६ (दशलक्ष टन)	जागतिक उत्पादन २०२५-२६ (दशलक्ष टन)	जागतिक उत्पादनात भारताचा सूचक वाटा	भारताचे जागतिक स्थान
अन्नधान्य*	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
तांदूळ	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
गहू	[illegible]	[illegible]	[illegible]	द्वितीय
मका	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

भारत हा जगातील प्रमुख अन्नधान्य उत्पादक देशांपैकी एक असून, विशेषतः तांदूळ उत्पादनात भारताचे स्थान मजबूत आहे. उपलब्ध माहितीमधील आंतरराष्ट्रीय तुलनेनुसार जागतिक अन्नसुरक्षेत महत्त्वपूर्ण योगदान देणारा देश म्हणून भारताचे स्थान अधिक दृढ होत आहे.

अन्नधान्य उत्पादनाची निर्यात क्षमता

विक्रमी उत्पादनामुळे भारताची निर्यात क्षमता, विशेषतः तांदूळ, गहू, मका आणि प्रक्रिया केलेल्या तृणधान्य उत्पादनांच्या बाबतीत अधिक बळकट झाली आहे. २०२५-२६ मधील एकूण उत्पादनापैकी तांदूळ, गहू आणि मका यांचा वाटा एकत्रितपणे सुमारे ३२९.७७ दशलक्ष टन इतका आहे; यामुळे देशांतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या दोन्हीसाठी उत्पादनाचा एक भक्कम आधार निर्माण झाला आहे.

कृषी आणि प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थ निर्यात विकास प्राधिकरणच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा तृणधान्य निर्यातदार देश होता आणि या निर्यातीचे मूल्य सुमारे १२.११ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके होते. २०२१ ते २०२५ या आर्थिक वर्षांच्या दरम्यान तृणधान्य निर्यात क्षेत्राने ६ टक्के चक्रवाढ वार्षिक वृद्धी दर नोंदवला. तांदूळ ही भारतासाठी अन्नधान्य निर्यातीची सर्वात मोठी संधी आहे. २०१२ पासून भारत हा जगातील सर्वात मोठा तांदूळ निर्यातदार देश राहिला असून, अलिकडच्या काळात जागतिक निर्यातीत भारताचा वाटा ३०-३५ टक्के इतका राहिला आहे. तांदळाची निर्यात २०२०-२१ मधील १७.७३ दशलक्ष टनांवरून वाढून २०२४-२५ मध्ये २०.१९ दशलक्ष टनांवर पोहोचली आहे. थोडक्यात, निर्यातीतील वाढ ही भारताच्या अन्नसुरक्षेच्या उद्दिष्टांना बाधा न आणता त्यांना पूरक ठरते.

●●●

- डॉ. सुमित वासनी
- डॉ. विलास अतकरे
- अजय एस. उईके
- कृ. म. वि. मूल

कृषी उद्योजक

शेतमाल विकण्याऐवजी प्रक्रिया करून विक्री

भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी धान्ये, कडधान्ये, तेलबिया, फळे आणि भाजीपाला यांचे उत्पादन घेतात. मात्र, काढणीनंतर अनेकदा शेतमालाची थेट कच्च्या स्वरूपात विक्री केली जाते. बाजारभावातील चढ-उतार, काढणीनंतर होणारे नुकसान, साठवणुकीच्या अडचणी आणि योग्य बाजारपेठेचा अभाव यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. अशा परिस्थितीत शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धित पदार्थांमध्ये रूपांतर करणे हा शेतकऱ्यांसाठी उत्पन्नवाढीचा एक चांगला मार्ग ठरू शकतो.

शेतमालाचे मूल्यवर्धन का करावे?

कच्च्या शेतमालावर योग्य प्रक्रिया केल्यामुळे त्याची गुणवत्ता, टिकवण क्षमता, उपयोगिता आणि बाजारातील मागणी वाढवता येते. उदाहरणार्थ, धान्यांची स्वच्छता, प्रतवारी आणि योग्य पॅकिंग करून त्याची चांगल्या गुणवत्तेचे उत्पादन म्हणून विक्री करता येते. कडधान्यांपासून डाळ, पीठ आणि विविध खाद्यपदार्थ तयार करता येतात. सोयाबीनपासून सोयापीठ, सोयादूध आणि टोफूसारखे पदार्थ तयार करता येतात. लघुधान्यांपासून पीठ, मिश्रित पीठ, लाडू, खिरीचे मिश्रण, नाश्त्याचे पदार्थ आणि तयार खाद्यपदार्थ बनवता येतात. म्हणून शेतकऱ्याने केवळ किती उत्पादन मिळाले? याचा विचार न करता या उत्पादनाचे अधिक मूल्य कसे निर्माण करता येईल? याचाही विचार करणे आवश्यक आहे.

प्राथमिक प्रक्रिया

मूल्यवर्धनाची सुरुवात प्राथमिक प्रक्रियेपासून होते. यात स्वच्छता, प्रतवारी, वाळवण आणि सुरक्षित साठवण यांचा समावेश होतो. शेतमालातील माती, दगड, काडीकचरा आणि इतर अशुद्धी दूर करणे आवश्यक आहे. आकार, वजन आणि गुणवत्तेनुसार प्रतवारी केल्यास एकसारख्या दर्जाचे उत्पादन मिळण्यास मदत होते. धान्ये आणि कडधान्ये साठवताना योग्य आर्द्रता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अपुरे वाळवण झाल्यास बुरशी, कीड आणि गुणवत्तेतील घट होण्याची शक्यता असते.

प्रक्रिया उद्योगाच्या संधी

गावात उपलब्ध असलेल्या शेतमालावर आधारित लघु प्रक्रिया उद्योग सुरू करता येतात. धान्यांपासून पीठ, कडधान्यांपासून डाळ व पीठ, तेलबियांपासून खाद्यतेल आणि इतर पदार्थ तयार करता येतात. फळे व भाजीपाल्यापासून वाळवलेले पदार्थ, फळांचा गर, पावडर, लोणची आणि इतर टिकाऊ पदार्थ तयार करता येतात. अशा उद्योगांसाठी स्वच्छता यंत्र, प्रतवारी यंत्र, वाळवण यंत्र, भरडण यंत्र, डाळ मिल, भाजणी यंत्र, सोलणी यंत्र आणि पॅकिंग यंत्र यांचा गरजेनुसार वापर करता येतो. यंत्रसामग्री घेताना उत्पादनाची क्षमता, वीजखर्च, देखभाल, उपलब्ध कच्चा माल आणि बाजारपेठेतील मागणी यांचा विचार करणे आवश्यक आहे.

शेतकरी ते कृषी उद्योजक

शेतकरी स्वतःच्या शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे पॅकिंग, नाविन्यपूर्ण सादरीकरण आणि थेट विक्री करू शकतो. तसेच शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी गट आणि महिला बचत गट यांच्या माध्यमातून सामूहिक प्रक्रिया उद्योग उभारता येतात. यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. प्रक्रिया उद्योग सुरू करण्यापूर्वी बाजारपेठेचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्राहकांची आवड, उत्पादनाची किंमत, पॅकिंगचे प्रमाण, स्पर्धकांची उत्पादने आणि विक्रीची ठिकाणे यांचा अभ्यास करावा.

शेतमालाचे उत्पादन ही कृषी व्यवसायाची पहिली पायरी आहे. त्यानंतर प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकिंग, दर्जानियंत्रण आणि बाजारपेठ या टप्प्यांतून शेतमालाचे आर्थिक मूल्य वाढवता येते. योग्य तंत्रज्ञान, गुणवत्तेची काळजी, बाजारपेठेचा अभ्यास आणि योग्य नियोजन यांच्या आधारे शेतकरी आपल्या उत्पादनाचे अधिक मूल्य मिळवू शकतो. शेतमाल केवळ विकू नका; त्यावर प्रक्रिया करा, मूल्य वाढवा आणि स्वतःची बाजारपेठ निर्माण करा. हा दृष्टीकोन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उत्पादकापासून कृषी उद्योजक होण्याच्या दिशेने घेऊन जाऊ शकतो.

●●●

-पूनम काकडे
आचार्य पदवी विद्यार्थिनी, प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी
- राजन बिसेन
वरिष्ठ संशोधन सहायक
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

हवामान

बंगालच्या उपसागरमध्ये अर्णब चक्रीवादळ, राज्याच्या पदरी निराशा

भौगोलिक घडामोडी : चक्रीवादळ अर्णब सध्या पूर्व-मध्य आणि त्याला लागून असलेल्या पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर सक्रिय आहे.

सध्याची स्थिती : २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११-३० वाजता ते गोपालपूर (ओडिशा) पासून ५५० किमी दक्षिण-आग्नेयेला आणि विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) पासून 580 किमी पूर्व-आग्नेयेला होते.

पुढील वाटचाल आणि तीव्रता : २६ ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत याचे रूपांतर तीव्र चक्रीवादळात होण्याची शक्यता होती. २७ ऑक्टोबर रोजी हे वादळ अतिशय तीव्र चक्रीवादळात बदलेल.

किनारपट्टी ओलांडण्याचा अंदाज: हे चक्रीवादळ उत्तर-पश्चिम दिशेने सरकत 28 ऑक्टोबर रोजी दुपारपूर्वी आंध्रप्रदेश आणि यानम किनारपट्टीवरील बापटला आणि विशाखापट्टणम दरम्यान अतिशय तीव्र चक्रीवादळ म्हणून धडकण्याची दाट शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग ताशी 115 ते 125 किमी आणि कमाल 140 किमी प्रतितास राहू शकतो.

पश्चिमी विक्षोभ : उत्तर हरियाणा आणि राजस्थानवर चक्रीवादळाची स्थिती आहे. तसेच एक द्रोणीय स्थिती तयार झाली असून, यामुळे 27 ऑक्टोबरच्या रात्रीपासून वायव्य भारतावर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

वरील सर्व बाबीचा अभ्यास करता राज्यात याचा प्रभाव हा विदर्भ,मराठवाडा आणि प. महाराष्ट्रा करिता राहणार आहे आणि 28 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाला पोषक वातावरण राहील. थंडी मध्ये किंचित वाढ आणि 2-5 नोव्हेंबर दरम्यान राज्यात धुई धुके वाढतील.

●●●

- अभिषेक खेरडे
हवामान अभ्यासक, अचलपूर

कृषी व्यवस्थापन

अलनिनोचा प्रभाव आणि दुष्काळी परिस्थितीत जनावरांचे व्यवस्थापन व नियोजन

भारत हा कृषी प्रधान देश असून, शेती आणि सद्यस्थितीत पशुपालन हे ग्रामीण अर्थ व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार स्तंभ आहे. महाराष्ट्रातील बव्हंशी जिल्ह्यासह विदर्भातील बहुतांश भागांत पावसाचे अनियमित वितरण, वाढते तापमान आणि पाण्याची कमतरता यांचा थेट परिणाम शेती व पशुपालनावर होतो. अशा परिस्थितीत अलनिनो ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना ज्याचा थेट संबंध दुष्काळ या संज्ञेशी आहे, ज्यामुळे शेती उत्पादन व पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. दुष्काळी परिस्थितीचा परिणाम केवळ पिकांच्या उत्पादनावर होत नाही, तर जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी आणि पशु खाद्य उपलब्धतेवर ही होतो. त्यामुळे अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पशु पालकांनी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

अल निनो म्हणजे काय? : विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान नेहमीपेक्षा जास्त वाढण्याच्या जागतिक हवामान घटकाला 'अल निनो' म्हणतात. यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होतात आणि भारतीय उपखंडात पावसाचे प्रमाण घटते किंवा पावसाचे वितरण विस्कळीत होते. भारतीय मान्सूनवर अल निनोचा प्रभाव अनेकदा प्रतिकूल दिसून येतो; तथापि, मान्सूनवर हिंद महासागरातील द्विध्रुव वातावरणीय परिस्थिती आणि इतर हवामान घटकांचाही प्रभाव असतो. त्यामुळे पावसाचा अंदाज आणि स्थानिक हवामान विषयक सूचना लक्षात घेऊन पशुधन व्यवस्थापनाचे नियोजन करणे गरजेचे आहे.

दुष्काळाचा जनावरांवर होणारा परिणाम

दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या आरोग्यावर, उत्पादनावर आणि प्रजनन क्षमतेवर विविध परिणाम दिसून येतात.

चारा टंचाई: हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घटल्यामुळे जनावरांना संतुलित आहार देणे कठीण होते.

पाण्याची कमतरता : पिण्यासाठी पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध न झाल्यास जनावरांच्या आरोग्यावर आणि दूध उत्पादनावर परिणाम होतो.

दूध उत्पादनात घट : ऊर्जा, प्रथिने आणि खनिजांचा अपुरा पुरवठा तसेच उष्णतेचा ताण यामुळे दूध उत्पादन कमी होऊ शकते.

वजन घटणे : पोषणाची कमतरता असल्यास जनावरांचे वजन कमी होते आणि शरीराची प्रतिकार शक्ती ही प्रभावित होऊ शकते.

प्रजनन समस्यांमध्ये वाढ : उष्णतेचा ताण आणि अपुरा आहार यामुळे माजाची लक्षणे कमी स्पष्ट दिसणे, गर्भधारणेचे प्रमाण घटणे यासारख्या समस्या उद्‌भवू शकतात.

रोगांचा धोका : कुपोषणामुळे जनावरांची रोग प्रतिकारक क्षमता कमी होण्याची शक्यता असते. म्हणूनच दुष्काळात जनावरांचे संरक्षण करण्यासाठी चारा, पाणी, निवारा आणि आरोग्याचे एकात्मिक नियोजन करणे आवश्यक आहे.

जनावरांसाठी चारा व्यवस्थापन

दुष्काळाच्या काळात पशु पालकांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे जनावरांना पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करून देणे. ज्वारी, बाजरी, मका आणि इतर योग्य चारा पिकांचा वाळलेला चारा व्यवस्थित साठवावा. चारा साठवणूक करताना जागा कोरडी, हवेशीर असावी आणि पावसाच्या पाण्यापासून सुरक्षित ठेवावी.

संतुलित आहाराचे महत्त्व : केवळ वाळलेला चारा देऊन जनावरांच्या सर्व पोषण गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे जनावरांचे वय, वजन, दूध उत्पादन आणि शारीरिक अवस्था यानुसार आहाराचे नियोजन करावे. आवश्यकतेनुसार संतुलित पशु खाद्य, खनिज मिश्रण आणि मीठ द्यावे. दूध देणाऱ्या, गाभण आणि वाढणार्या जनावरांना विशेष प्राधान्य द्यावे.

पाणी व्यवस्थापन : दुष्काळात जनावरांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याची कमतरता झाल्यास दूध उत्पादन, चारा खाण्याचे प्रमाण आणि जनावरांचे आरोग्य प्रभावित होऊ शकते. जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करून पाण्याच्या टाक्या नियमित स्वच्छ कराव्यात. पाण्याच्या टाक्या सावलीत ठेवाव्यात आणि पाण्याची गळती टाळावी.

रोग प्रतिबंधक व्यवस्थापन : दुष्काळी परिस्थितीत पोषणाची कमतरता आणि उष्णतेचा ताण यामुळे जनावरांची प्रतिकारशक्ती प्रभावित होऊ शकते. त्यामुळे जनावरांचे लसीकरण पशु वैद्यकीय सल्ल्यानुसार वेळेवर पूर्ण करावे. जंतनाशक औषधांचा वापर योग्य वेळी आणि पशु वैद्यकीय सल्ल्याने करावा.

आर्थिक नियोजन : दुष्काळ दीर्घ काळ टिकल्यास उपलब्ध चारा आणि पाणी यांच्यावर जनावरांची संख्या किती आहे, याचा मोठा परिणाम होतो. अधिक दूध देणाऱ्या, निरोगी आणि प्रजननक्षम जनावरांना उपलब्ध चारा व पशु खाद्यात प्राधान्य द्यावे. ●●●

- डॉ. गणेश उत्तमराव काळुसे
शास्त्रज्ञ (पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र), कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)
- मनेश पुंडलिकराव यदुलवार
कृषी हवामान तज्ज्ञ, जिल्हा कृषी हवामान केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)

कृषी कीड नियंत्रण

मित्र कीटक; शेतकऱ्याचा न दिसणारा मित्र

किडींच्या नियंत्रणासाठी निसर्गाची फौज ओळखा

शेतात एखादी कीड दिसली की, शेतकऱ्यांच्या मनात पहिला विचार येतो तो म्हणजे, यावर कोणती फवारणी करावी? मात्र पिकावर दिसणारा प्रत्येक कीटक हा पिकाचा शत्रू नसतो. अनेक कीटक असे आहेत, जे पिकांचे नुकसान करणाऱ्या किडींवर नैसर्गिकरीत्या नियंत्रण ठेवतात. हेच कीटक म्हणजे मित्र कीटक किंवा नैसर्गिक शत्रू. पिकांच्या संरक्षणासाठी निसर्गानेच तयार केलेली ही छोटीशी फौज शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

आपल्या शेतात मावा, तुडतुडे, पांढरी माशी, पाने खाणाऱ्या अळ्या किंवा खोड किडींचा प्रादुर्भाव होत असताना त्यांच्यासोबत काही उपयुक्त कीटक ही सक्रिय असतात. लेडी बर्डबीटल, क्रायसोपर्ला, कोळी, विविध परजीवी आणि ट्रायकोग्रामा यासारखे मित्र कीटक हानिकारक किडींची संख्या कमी करण्याचे काम करतात. त्यामुळे कीड नियंत्रणात मित्र कीटकांची भूमिका समजून घेणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही शाश्वत शेतीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

मित्र कीटक करतात तरी काय?

मित्र कीटक मुख्यतः दोन प्रकारे किडींचे नियंत्रण करतात. काही मित्र कीटक भक्षक असतात. तेमावा, तुडतुडे, पांढरीमाशी, अळ्या किंवा इतर लहान किडी थेट खाऊन त्यांची संख्या कमी करतात. दुसऱ्या प्रकारातील कीटकांना परजीवी म्हणतात. हे हानिकारक किडींच्या अंडी किंवा अळीच्या शरीरात परजीवीकरण करून त्यांचा विकास थांबवतात.

उदाहरणार्थ, लेडी बर्डबीटल हा मावा आणि इतर रस शोषक किडींचा महत्त्वाचा भक्षक आहे. त्याचप्रमाणे क्रायसोपर्लाच्या अळ्या मावा, पांढरीमाशी आणि इतर लहान किडींवर उपजीविका करतात. शेतातील कोळी विविध प्रकारच्या किडींना भक्ष्य करून त्यांची संख्या कमी करतात. हे कीटक शेतकऱ्याच्या नकळत दिवसरात्र पिकांचे संरक्षण करत असतात.

ट्रायकोग्रामा : किडीच्या जन्माआधीच नियंत्रण

मित्र कीटकांमध्ये ट्रायकोग्रामा हा जैविक कीड नियंत्रणातील महत्त्वाचा घटक आहे. हा अतिशय सूक्ष्म परजीवीवास्प असून, तो हानिकारक पतंगवर्गीय किडींच्या अंड्यांमध्ये परजीविकरण करतो. म्हणजेच हानिकारक किडीची अळी पिकावर येऊन नुकसान करण्यापूर्वीच तिच्या अंड्याच्या अवस्थेत नियंत्रण करण्याची संधी मिळते.

ट्रायकोग्रामा उपलब्ध करून देण्यासाठी ट्रायकोकार्ड वापरले जाते. कार्डवरील परजीवी अंड्यांमधून ट्रायकोग्रामा बाहेर पडतो आणि पिकावर असलेल्या लक्ष्य किडींची अंडी शोधून त्यात परजीविकरण करतो. परिणामी त्या अंड्यांमधून हानिकारक अळी बाहेर पडण्याची शक्यता कमी होते.

फवारणीपूर्वी मित्र कीटकांची पाहणी करा

शेतात कीड दिसली की तातडीने फवारणी करण्याऐवजी काही मिनिटे पिकाचे निरीक्षण करणे फायदेशीर ठरू शकते. पानांच्या वरच्या आणि खालच्या बाजूला, फुलांमध्ये तसेच कोवळ्या फुटींवर हानिकारक किडींबरोबरच मित्र कीटक आहेत का, हे पाहावे.

उदाहरणार्थ, एखाद्या पिकावर मावा दिसत असला आणि त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर लेडीबर्डबीटल किंवा क्रायसोपर्लाच्या अळ्या आढळत असतील, तर परिस्थितीचा विचार करूनच पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे. कारण अशावेळी केलेली अनावश्यक किंवा अयोग्य फवारणी हानिकारक किडींसोबत उपयुक्त मित्र कीटकांनाही नुकसान करू शकते. म्हणूनच कीड दिसली म्हणजे लगेच फवारणी याऐवजी कीड ओळखा, प्रादुर्भावाचे निरीक्षण करा, मित्र कीटक पाहा आणि त्यानंतरच निर्णय घ्या हा दृष्टीकोन अधिक उपयुक्त ठरतो.

मित्र कीटकांचे संवर्धन कसे कराल?

मित्र कीटक शेतात टिकून राहण्यासाठी त्यांना योग्य वातावरण मिळणे आवश्यक आहे. शेतात अनावश्यक कीटकनाशकांची फवारणी टाळणे, शिफारशीनुसारच कीटक नाशकांचा वापर करणे आणि मित्र कीटकांचे अधिवास टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे.

फुलोरा देणाऱ्या वनस्पती, विविध वनस्पतींची उपलब्धता आणि शेतातील जैव विविधता यामुळे अनेक उपयुक्त कीटकांना अन्न व आश्रय मिळतो. त्यामुळे शेतातील प्रत्येक कीटक नष्ट करणे हेच कीड व्यवस्थापनाचे उद्दिष्ट नसावे. हानिकारक कीड आणि उपयुक्त कीटक यांच्यातील संतुलन राखणे हा एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहे.



लक्षात ठेवाव्या अशा पाच गोष्टी

१. प्रत्येक कीटक हा शत्रू नसतो.
२. फवारणीपूर्वी पिकाचे आणि मित्र कीटकांचे निरीक्षण करा.
३. लेडीबर्ड, क्रायसोपर्ला, कोळी आणि परजीवी कीटकांचे संवर्धन करा.
४. योग्य पिकासाठी आणि योग्य किडीसाठी जैविक नियंत्रण पद्धतींचा वापर करा.
५. कीटक नाशकांचा वापर नेहमी शिफारशीनुसार आणि गरजेनुसार करा.

शेतात फिरताना आता केवळ किती कीड आहे? एवढेच पाहू नका; किती मित्र कीटक आहेत? हे पाहा. कारण पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्याच्या हातात फवारणीचे पंप असतात, पण निसर्गाच्या हातात त्याहून ही प्रभावी अशी मित्र कीटकांची फौज असते.

●●●

मित्र कीटकांना महत्त्व

आजच्या काळात शाश्वत शेती, उत्पादन खर्चात बचत आणि पर्यावरणपूरक पीक संरक्षण यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापनामध्ये पीक निरीक्षण, प्रतिबंधात्मक उपाय, जैविक नियंत्रण, यांत्रिक व सांस्कृतिक उपाय आणि आवश्यकतेनुसार रासायनिक नियंत्रण यांचा समन्वय केला जातो.

यामध्ये मित्र कीटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

रासायनिक कीटक नाशकांचा वापर पूर्णपणे बंद करणे हा उद्देश नसून, गरज नसताना फवारणी टाळणे आणि गरज भासल्यास योग्य शिफारशी प्रमाणे निवडक व जबाबदारीने वापर करणे हा अधिक योग्य दृष्टीकोन आहे.

- डॉ. स्वाती संत
प्रकल्प अधिकारी (कीटकशास्त्र), नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई
- वैभव शिंदे
सहायक प्राध्यापक, कृषी विस्तार शिक्षण

❍ संयोजक : निखिल रमेश यादव, कृषी पदव्युत्तर - ८४०८९१२७०६ ❍

इनोव्हा पुलाखाली कोसळली

परभणी-मानवत महामार्गावर पहाटे ५ च्या सुमारास घडली घटना, ५ ते ६ प्रवाशी जखमी

परभणी (प्रतिनिधी): परभणी ते मानवत दरम्यानच्या महामार्गावर बुधवार दि.२८ रोजी पहाटे पाचच्या सुमारास पुन्हा एकदा अपघात झाला. एमएच १२ डीवाय ०१०५ क्रमांकाची इनोव्हा कार पुलाखाली कोसळल्याने या अपघातात पाच ते सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान याच पुलावर यापुर्वीही अनेक घटना घडल्या आहेत.

परभणी- मानवत या महामार्गावरील किन्होळा पाटीजवळील पुलाचे काम मागील काही दिवसांपासून सुरू आहे. मात्र, काम सुरू असलेल्या पुलाजवळ आवश्यक दिशादर्शक फलक किंवा वाहनचालकांना सावध करणारी पुरेशी सूचना नसल्याने वाहनधारकांना पुलाचा अंदाज येत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहने पुलात पडण्याच्या घटना घडत आहेत. परंतु या संदर्भात कुठलाही उपाययोजना करण्यात आली नसल्याने परत एकदा याच ठिकाणी अपघात घडला आहे. परभणी-मानवत हा महत्त्वाचा महामार्ग असल्याने या मार्गावरून दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. अशा वर्दळीच्या मार्गावर पुलाचे काम सुरू असताना योग्य दिशादर्शक फलक, बॅरिकेड्स आणि रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसणाऱ्या सूचना लावणे आवश्यक आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.या अपघाताच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणेने पुलाच्या ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात आणि दिशादर्शक फलक लावावेत, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे. अन्यथा, अशा अपघातांमुळे आणखी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

परभणीच्या आद्या बाहेतीला कास्यपदक

परभणी: इंग्लंड येथील शेफिल्ड शहरामध्ये नुकत्याच पार पडलेल्या अकरा वर्षाखालील जागतिक ऑलिंपिक आशेचा किरण या स्पर्धेत मुलींच्या गटामध्ये परभणीची आद्या बाहेती हिने कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत १६ खेळाडूंनी वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधित्व करत सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेमध्ये परभणीच्या आद्या बाहेतीने एकूण पंधरा सामने खेळले, या पंधरा सामन्यांमधील तेरा सामन्यांमध्ये विजय मिळवत कांस्यपदक पटकावले. आद्या बाहेती ही भारतीय खेल प्राधिकरण, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत चालणाऱ्या परभणी येथील खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र व मिशन लक्षवेध प्रतिभा विकास केंद्रामध्ये चेतन मुक्तावर व सूरज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेते आहे.

कोयत्याच्या पैश्यावरून डोके फोडल, गुन्हा दाखल

चारठाणा (प्रतिनिधी):पंढरपूर येथे जाण्यासाठी निघालेल्या एकावर खडकपाटी येथे कोयत्याच्या पैसावरून वाद घालून डोक्यात दगड मारून डोके फोडल्याची घटना गुरूवारी(दि. २२) घडली होती.याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून मंगळवारी (दि.२७) चारठाणा पोलीस ठाण्यात एका जणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खुशाल देवु राठोड रा.मालेगाव ता. जिंतूर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमुद केले की, अशोक भुजंग राठोड रा. मालेगाव ता. जिंतुर याने गुरूवारी सायकाळी ७ वाजेच्या सुमारास फिर्यादी हा पंढरपुर येथे जाण्यासाठी निघाला असता खडकपाटी येथे थांबला होता. यावेळी फिर्यादीस अशोक राठोड याने, तु इकडे कशाला आला?असे विचारल्यानंतर फिर्यादीने, संजय रुस्तुम राठोड यास नेण्यासाठी आलो आहे असे म्हणताच संजय तुझ्या सोबत येणार नाही तु येथून निघ, असे म्हणाला. फिर्यादीने संजय यास कोयत्याचे पैसे दिलेले आहेत. मी त्याला घेवुन जाणार आहे, असे म्हणताच अशोक राठोड याने फिर्यादीस शिवीगाळ करत डोक्यात दगड मारून डोके फोडले व लाथाबुक्याने मारहाण केली.

या प्रकरणी खुशाल राठोड यांच्या फिर्यादीवरून अशोक राठोड याच्याविरूध्द चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरिक्षक बालाजी पुंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार सरोदे हे करीत आहेत.

परभणी जिल्ह्यातील ९ गुन्ह्याची उकल

परभणी (प्रतिनिधी):जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या घरफोडी व चोरीच्या नऊ गुन्ह्यांची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या कारवाईत सोने आणि रोख रकमेसह एकूण ६ लाख १० हजार ८२६ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक चिखले आणि पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास करीत होते. दरम्यान, गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा परभणीतील दर्गा रोड परिसरात शोध घेण्यात आला. जामकर विद्यालयाच्या पाठीमागील मैदानात पाल टाकून राहणाऱ्या ठिकाणी तो बालक त्याच्या आईसह आढळून आला. पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता, संबंधित बालकाने अन्य तीन साथीदारांसह परभणी जिल्ह्यातील विविध ठिकाणी घरफोड्या केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर संबंधित गुन्ह्यांतील मुद्देमालाबाबत चौकशी केली असता, बालकाच्या वाट्याला आलेला मुद्देमाल त्याच्या आईने दोन पंचांसमक्ष पालातून काढून दिला. या कारवाईत नवा मोंढा, पालम, ताडकळस, जिंतूर, चारठाणा, सेलू आणि दैठणा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील प्रत्येकी नोंदविलेल्या गुन्ह्यांसह पालममधील दोन गुन्हे, तसेच जालना जिल्ह्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्याची उकल झाली आहे. अशा एकूण नऊ गुन्ह्यांचा समावेश आहे.

ही कामगिरी पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, जीपीएसआय मधुकर चट्टे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, पोलीस हवालदार केशव लटपटे, लक्ष्मण कांगणे, मुकेश बुधवंत, पांडुरंग तुपसुंदर, नेताजी गीते, सुनील राठोड तसेच पोलीस कर्मचारी उमेश चव्हाण आणि विलास बहुरे यांच्या पथकाने केली.

परभणीत राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेचा शुभारंभ

परभणी (प्रतिनिधी): येथील बाल विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ शाळेत महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या हस्ते राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा शुभारंभ मंगळवार दि.२७ रोजी करण्यात आला.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रावजी सोनवणे, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पना सावंत, प्राचार्य अरुण बोराडे यांची उपस्थिती होती. या मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. परभणी शहरामध्ये राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिममध्ये शाळा व अंगणवाडीमधील बालकांचे उदिष्ट ७६ हजार ७६ एवढे आहे. उद्घाटन सोहळ्यात आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. कुपोषणावर मात करण्यासाठी ही जंतनाशक मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. या मोहिमेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि पालकांनी यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी व आरोग्य प्रशासनाच्या वतीने यावेळी करण्यात आले.

परभणी ते मानवत महामार्गावरील किन्होळा पाटीजवळील इनोव्हा गाडी पुलाखाली पडल्याची घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली. ही घटना घडल्यानंतर वाहतुक शाखेने तात्काळ दखल घेत या ठिकाणी आता गतिरोधक बसविण्याचे काम हाती घेतले. मात्र हेच काम आधी केले असते तर असे अपघात घडले नसते वराती मागुन घोडे अशीच परिस्थिती पहावयास मिळत आहे.

मराठी भाषेचे संवर्धन करणे ही समाजाची जबाबदार : कुलकर्णी

परभणी (प्रतिनिधी): द म ाऊली पठाडे यांच्या हस्ते गरजूंना दिवाळीनिमित्त शिधा वाटप

प्रतिनिधी : अनिल चव्हाण

ताडबोरगाव : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर समाजातील गरजू, विधवा व दिव्यांग व्यक्तींना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने ताडबोरगाव येथे माऊली पठाडे यांच्या हस्ते अन्नधान्याच्या शिधा किटचे वाटप करण्यात आले.

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे व खासदार मा. श्रीकांतजी शिंदे यांच्या आशीर्वादाने, तसेच परभणी-हिंगोली विधान परिषद मतदारसंघाचे शिवसेना नेते आमदार मा. सईद खान यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. पाथरी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा प्रमुख मा. श्री. बालाजी कुऱ्हाडे व सभापती कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम पार पडला.

दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा आणि गरजू कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या उद्देशाने विधवा व दिव्यांग व्यक्तींना

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ३ लाख १३ हजार १११ रूपयांची मदत

झरी (प्रतिनिधी): माजी आ. तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रामप्रसाद बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वाढदिवसावर कोणताही खर्च न करता मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ३ लाख १३ हजार १११ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत व्हावी, या उद्देशाने हा निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या उपस्थितीत जि.प.चे गटनेते दिलीपराव देशमुख, सुनील भोंबे, सुरज पंजवानी, अशोक जेठवाणी यांच्या वतीने धनादेश देण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाची दखल घेतली.

यंदा पावसाच्या कमतरतेमुळे राज्यातील

अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, या भावनेतून वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून मुख्यमंत्री सहायता निधीस आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढदिवस म्हटले की हारतुरे, सत्कार, जाहिरातबाजी आणि विविध कार्यक्रमांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. मात्र, दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या अडचणी लक्षात घेऊन या खर्चाला फाटा देत मदतीचा हात पुढे करण्यात आला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनशीलता अधोरेखित झाली आहे.

रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आलेल्या या मदतीमुळे वाढदिवस केवळ आनंदोत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक कार्यासाठी उपयोगात आणण्याचा संदेश देण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अशा प्रकारे पुढाकार घेणे ही काळाची गरज असून, समाजातील इतर घटकांनीही संकटग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी पुढे यावे, असा संदेश या उपक्रमातून मिळत आहे.

पर्यायी शेतरस्त्यासाठी साखरे कुटूंबाचे उपोषण

परभणी (प्रतिनिधी): मानवत तालुक्यातील सावरगाव खु. येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य पर्यायी रस्ता मिळावा, या मागणीसाठी बाबाराव साखरे व इतर शेतकरी मानवत तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले असुन उपोषणाच्या तिसरा दिवस असुनही प्रशासनाने अद्यापही कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप केला आहे.

उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मालकीच्या गट क्र.१३५ मध्ये जाण्यासाठी शासकीय नकाशावर रस्ता आहे. मात्र, या रस्त्यापुढे मोठा नैसर्गिक ओढा असल्याने शेतीची अवजारे व ट्रॅक्टर शेतात नेणे अशक्य होत आहे. त्यामुळे गट क्र.१३३ व १३४ च्या बांधावरून पर्यायी रस्ता देण्याची मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणात उपविभागीय अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती व कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन योग्य निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, तहसीलदारांनी दिलेला पर्यायी रस्ता पाच वेगवेगळ्या गटांच्या बांधावरून आणि नैसर्गिक नालीतून जात असल्याने तो शेतीच्या कामासाठी गैरसोयीचा असल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे. जवळचा व सोयीचा रस्ता उपलब्ध करून देण्याऐवजी चुकीचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

आट्यापाट्या निवड चाचणीत ११५ खेळाडूंचा सहभाग

सेलू (प्रतिनिधी): जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनच्या वतीने सेलू तालुका क्रीडा संकुल येथे ज्युनियर गटातील जिल्हास्तरीय आट्यापाट्या निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत एकूण ११५ खेळाडूंनी सहभाग घेतला. मुलांच्या सहा, तर मुलींच्या तीन संघांनी आपले कौशल्य दाखविले.

मुलांच्या गटात सातेफळ संघाने प्रथम, कावलगाव संघाने द्वितीय, तर पालम आणि सेलू संघांनी तृतीय क्रमांक मिळविला. मुलींच्या गटात सातेफळ संघाने प्रथम, पालम संघाने द्वितीय, तर पूर्णा संघाने तृतीय क्रमांक पटकावला.या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे रायगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय ज्युनियर आट्यापाट्या स्पर्धेसाठी मुलांचे व मुलींचे जिल्हा संघ लवकरच घोषित करण्यात येणार आहेत.

स्पर्धेच्या प्रारंभी गणेश माळवे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून क्रीडांगणाचे पूजन करण्यात आले व निवड चाचणीला सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे माधव लोकुलवार यांनी खेळाडूना आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी पंच म्हणून सिकंदर सय्यद, गोविंद शिंदे, श्रीकांत, विनायक आणि गंगाधर पिसाळ यांनी काम पाहिले. परभणी जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनचे सचिव एम. एम. क्षीरसागर यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

पुस्तकी ज्ञानासोबत प्रशासकीय अनुभवाची शिदोरी

मानवत (प्रतिनिधी): नगर परिषदेमध्ये राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे ऑन-जॉब प्रशिक्षण नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कार्याचा अनुभव मिळावा, या उद्देशाने के. के.एम.महाविद्यालयाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्षातील नऊ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी सहभाग नोंदविला.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना विविध शासकीय व प्रशासकीय कार्यालया मध्ये प्रत्येक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यानुसार मानवत येथील के.के.एम.च्या राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना नगर परिषदेत विविध विभागांच्या कार्य पद्धती यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळत आहे.या प्रसंगी मुख्याधिकारी कोमलताई सावरे यांनी विद्यार्थ्यांना नगर परिषदेची प्रशासकीय रचना,विविध शासकीय योजना,नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवाबाबत मार्गदर्शन केले. कार्यालयीन अधीक्षक भरत पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध विभागांना भेट देऊन कार्यालयीन कामकाज आणि नागरिकांशी सुसंवाद व संबंधित माहिती दिली.

'एकाव ते नवलंच' भ्रष्टाचार चौकशीसाठी सर्व पक्ष एकत्र

सेलू (प्रतिनिधी): नगर परिषद हद्दीत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अनेक वर्षीपासून झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेससह सत्ताधारी भाजपा, शिवसेना (शिंदे गट) नगरसेवकांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सन २०१८ ते २०२२ या कालावधीमध्ये पी.एम. आवास योजनेअंतर्गत सुमारे ९०० ते १००० लाभार्थ्यांच्या अनुदानातून कोणतीही पूर्वकल्पना वा माहिती न देता प्रत्येकी ८ हजाराची कपात करण्यात आली आहे. ही कपात केवळ सेलू नगर परिषदेनेच केली असून, ती कोणत्या निकषांच्या आधारे करण्यात आली, याचा उलगडा झालेला नाही. शासकीय मानांकनानुसार तीन हप्त्यांमध्ये मिळणारा निधी लाभार्थ्यांना वेळेत व ठरल्याप्रमाणे वितरित करण्यात आलेला नाही. नियमानुसार शेवटचा हप्ता ५० हजार देणे आवश्यक असतानाही, जमा रक्कमेच्या व्याजापोटी ९०० ते १हजार लाभार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला आहे. या जमा रक्कमेवर मिळालेल्या व्याजाचा एकूण आकडा किती आणि त्या रक्कमेचा विनियोग कोणत्या कामासाठी करण्यात आला, याची संपूर्ण माहिती नगर परिषदेने लेखी स्वरूपात द्यावी, अशी मागणी काँग्रेस नगरसेवकासह सत्ताधारी भाजपा व शिवसेना (शिंदे गट) नगरसेवकांनी केली आहे. तसेच, या योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची तात्काळ चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी निवेदनातून केली आहे.या निवेदनावर काँग्रेस नगरसेवक विनोद धापसे,भाजपा नगरसेवक शिला काजळे,गयाबाई सोनवणे,मनिष कदम,सपना काळे,दिपक कोल्हाळ,आशा पहाडे,अनूपमा देवधर,रहेमत तडवी अलीखान स्वाक्षऱ्या आहेत.

'आस्मानीनं मारलं, सुल्तानीनं मारलं, तुम्हीच होते का बाकी?'

जिंतुरमध्ये कोजागिरीच्या चांदण्यात रंगला काव्यजागर

जिंतुर (प्रतिनिधी): 'अस्मानीनं मारलं, सुल्तानीनं मारलं, तुम्हीच होते का बाकी?' या कवी ललित अधाने यांच्या कवितेतील सवालाने व्यवस्थेतील विसंगतींवर मार्मिक भाष्य केले. शेतकऱ्यांच्या वेदना, बेरोजगारी, राजकीय वास्तव आणि सामान्य माणसाच्या जगण्यातील संघर्ष अशा विविध विषयांवर कवितांच्या माध्यमातून प्रभावी भाष्य करत 'काव्यजागर' रंगला.

शब्दसह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लक्ष्मी फंक्शन हॉल येथे या काव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. निमंत्रित कवींनी आपल्या प्रभावी काव्य सादरीकरणातून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात कवी ललित अधाने, अरुण पवार, अरविंद सगर आणि आत्माराम जाधव यांनी आपल्या कवितांतून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडली. शेतकऱ्यांचे दुष्काळग्रस्त जीवन, बेरोजगारी, राजकीय व्यवस्थेतील विसंगती, सामान्य माणसाची घुसमट, ग्रामीण जीवनातील वास्तव आणि आईच्या मायेच्या आठवणी अशा विविध विषयांनी काव्यजागर समृद्ध झाला.

कवी ललित अधाने यांनी

'अस्मानीनं मारलं, सुल्तानीनं मारलं, तुम्हीच होते का बाकी?' या कवितेतून शेतकरी आणि सामान्य माणसाच्या संघर्षाचे वास्तव मांडले.कवी अरुण पवार यांनी 'आता सांगू नको गोष्टी मला स्वर्गातल्या, किती गोड होत्या आठवणी वर्गातल्या' या ओळींतून ग्रामीण भागातील तरुणांच्या शिक्षण, रोजगार आणि बदलत्या जीवनाचे चित्र उभे केले. कवी आत्माराम जाधव यांनी 'बेकारीचा प्रश्न जरा बाजूला सारू, चला गड्यांनो देशभक्तीच्या गप्पा मारू' या उपरोधिक रचनेतून राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. तसेच 'काजळा सारखा रंग माझा तरी, माय माझी मला तीट लावायची' या भावस्पर्शी ओळींतून आईच्या मायेच्या आठवणी जागविल्या. कवी अरविंद सगर यांनी 'अहो जंगल तुमचे, डोंगर तुमचे, तुमचे चौक अन् रस्ते...' या कवितेतून सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर उपरोधिक टीका केली.तसेच 'माणूस मारण्याचा ज्यांना पगार होता' या आशयाच्या कवितेतून मानवी संवेदना आणि व्यवस्थेतील क्रूरतेवर भाष्य केले. कोजागिरीच्या चांदण्यात कविता, विचार आणि संवेदनांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कविता, ग्रामीण बोलीतील सहजता, उपरोध आणि भावनिक अभिव्यक्ती यामुळे काव्यजागर अधिक रंगतदार झाला. यावेळी रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कविता ही माणसाला संवेदनशील बनवते: अंभुरे

साहित्य, कला, कविता आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून माणसातील माणूसपणा जागृत ठेवण्याचे कार्य सातत्याने झाले पाहिजे. अशा चळवळी समाजाला केवळ सांस्कृतिक समृद्धीच देत नाहीत, तर सामाजिक परिवर्तनाची प्रेरणाही देतात असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे संचालक प्रा.डॉ. कैलास अंभुरे यांनी व्यक्त केले.

गरजुंना दिवाळीनिमित्त शिधा वाटप

पाथरी (प्रतिनिधी): दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर समाजातील गरजू, विधवा व दिव्यांग व्यक्तींना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने ताडबोरगाव येथे माऊली पठाडे यांच्या हस्ते अन्नधान्याच्या शिधा किटचे वाटप करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व खा.श्रीकांत शिंदे यांच्या आशीर्वादाने,तसेच शिवसेना नेते आ. सईद खान यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

विधानसभा प्रमुख बालाजी कुऱ्हाडे व सभापती कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम पार पडला.

हरवली आहे

माझी चि. सुहास प्रभाकर पान्हेरे, रा. ओंकारनगर, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी. या नावाची NEET (UG) २०२१ परीक्षेची मूळ गुणपत्रिका (मार्क मेमो) व शैक्षणिक कागदपत्रे पाथरी ते परभणी प्रवासा दरम्यान हरवली आहेत. सदर कागदपत्रे कोणास आढळल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

पत्ता: प्रभाकर दत्तात्रय पान्हेरे,ओंकारनगर, पाथरी, जि. परभणी.

मो. नं.:९४२००३७२७६

विष्णुपुरीत १५० दलघमी पाणी; तरीही जनावरे तहानलेली!

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२८ ऑक्टोबर -

विष्णुपुरी-अंतेश्वर-दिग्रस प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले असून प्रकल्पात अंदाजे १५० दलघमी पाणी उपलब्ध असल्याचा दावा विष्णुपुरी प्रकल्प लाभार्थी संघर्ष समितीने केला आहे. एकीकडे प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध असताना दुसरीकडे ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुधनाला पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे.

उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यास मोठ्या प्रमाणात पाणी बाष्पीभवनामुळे वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची आवश्यक सुरक्षित व्यवस्था कायम ठेवून उर्वरित पाण्याचा उपयोग ग्रामीण भागातील पशुधन आणि शेतकर्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

विष्णुपुरी प्रकल्पातून एमआयडीसीकडून मोठ्या प्रमाणात पाणी उपसा सुरू असल्याचा आरोप समितीने केला आहे. उद्योगांसाठी पाणी उपलब्ध होते, मात्र त्याच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकरी आणि पशुधनासाठी पाणी सोडताना प्रशासनाकडून निर्णय होत नाही, हा दुजाभाव असल्याची भावना ग्रामीण भागात निर्माण झाली

आहे. शेतकरी आज केवळ शेतीसाठी पाणी मागत नाही. त्याच्या गोठ्यातील जनावरांसाठी पिण्याचे पाणी मागत आहे. जनावरांना पाणी मिळाले नाही तर दूध उत्पादन, पशुधनाचे आरोग्य आणि शेतकर्याची संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था प्रभावित होते.

विष्णुपुरी कालव्यातून ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुधनासाठी तातडीने तीन पाणीपाळ्या सोडाव्यात, अशी मागणी समितीने केली आहे. तसेच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण होईपर्यंत एमआयडीसीचा पाणीउपसा तात्पुरता बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था कायम ठेवून उर्वरित उपलब्ध पाण्याचे न्याय्य नियोजन करावे. बाष्पीभवनामुळे पाणी वाया जाण्यापेक्षा ते तहानलेल्या पशुधनासाठी आणि ग्रामीण जनतेसाठी वापरावे, असे समितीचे म्हणणे आहे.

या मागणीसाठी विष्णुपुरी प्रकल्प लाभार्थी संघर्ष समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्याकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली आहे. प्रकल्पात पाणी असूनही शेतकरी आणि पशुधन तहानलेले राहणे स्वीकारले जाणार नाही. उपलब्ध पाण्याचे न्याय्य नियोजन करून तीन पाणीपाळ्या मिळाल्याच पाहिजेत, अशी भूमिका समितीने मांडली आहे.

या मागणीसाठी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, शिवाजीराव पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, लिंगोजी पाटील हरबळकर, माधवराव देसाई, सुरेशराव बोरगावकर, काशिनाथ पाटील पळशीकर, देवराज देसाई, खुशाल पाटील दगडगावकर, रघुनाथराव मोरे आणि परमेश्वर मोरे यांनी पुढाकार घेतला आहे.

शेतकर्याच्या शेतासाठी नंतर पाणी द्या; पण आधी त्याच्या घरातील माणसाला आणि गोठ्यातील मुक्या जनावराला पिण्याचे पाणी द्या. पाणी उपलब्ध असताना त्याला तहानलेले ठेवणे हा प्रश्न केवळ पाणीवाटपाचा नसून मानवी आणि पशुधनाच्या जगण्याचा आहे, अशी भावना लाभार्थी शेतकर्यांनी व्यक्त केली आहे.

पाणी अडवण्यासाठी नगरपरिषद प्रशासनातर्फे तात्पुरत्या बंधाराच्या कामास वेग

तभा वृतसेवा
हदगाव, दि.२८ ऑक्टोबर -

लवकरच ईसापुर धरणातून प्रथम पाण्याची पाळी कॅनॉल च्या माध्यमातून क्रमवारीने सोडण्यात येणार असून आपल्या हक्काचे आरक्षित असलेले पाणी पुढे वाहून गेल्यास आपले नुकसान होऊ नये तसेच नदीपात्रात ज्या ठिकाणी जॅक वेल आहेत तिथेच पाणीसाठा अडून राहावे याकरिता हदगाव नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने आज नदीपत्रात तात्पुरता बंधाराच्या(कॉफर डॅम) चे काम पूर्ण झाले असून उर्वरित राहिलेले थोडेसे काम हे लवकरच पूर्ण होतील अशी माहिती मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी दिली असून यामुळे हदगावातील नागरिकांची पाण्यापासून होणारी अडचण दूर होण्यास मदत होईल. सदरील तात्पुरत्या बंधाराच्या काम करण्यासाठी हदगाव नगर परिषदेचे सतीश देशमुख, धीरज झुडपे, संकेत लाडगे, रवी डेंगळे, प्रशांत डोईजड, गोविंद सिरसाट यांनी साधारणतः १० किलोमीटरचे पायी सर्वे

क्षण केले.

यावर्षी अत्यल्प पडलेल्या पाण्यामुळे व अल निनोच्या प्रभावामुळे वातावरणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. पुढे भविष्यात हदगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांची व जनावरांची पिण्याची पाण्याची व पुढील पिकांकरिता पाण्याची समस्या लक्षात घेता इसापूर धरणातून पाणी सोडण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे घेतलेल्या निर्णयावरून दिसून येत आहे. त्यातच पुढच्या नवंबर महिन्यात पहिली पाण्याची पाळी ईसापुर धरणातून कॅनॉल च्या माध्यमातून क्रमवार पद्धतीने सोडण्यात येणार आहे त्याची पूर्वतयारीसाठी नदीमध्ये जिथे जॅक वेल आहेत त्या ठिकाणी पाणीसाठा अडून राहावे व आपले नुकसान कमी व्हावे यासाठी आज रोजी हदगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या उपस्थितीत तात्पुरता बंधारा कॉफर डॅम तयार केला असून उर्वरित राहिलेले काम लवकरच पूर्ण होतील व त्यामुळे हदगाव शहरातील नागरिकांना पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे. यावेळी सदरील बंधाराच्या कामाकरिता मागच्या काही दिवसापासून नगर परिषद हदगावातील सर्व अधिकारी, कर्मचारी बांधव हे परिश्रम घेताना दिसून येत आहे.

परमेश्वर मंदिरात कोजागिरीनिमित्त भावगीतांची सुरेल मैफल

हिमायतनगर -येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री परमेश्वर मंदिरात कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून ओंकार संस्था, पुणे संचलित 'स्वरझंकार'च्या वतीने भावगीतांच्या सुरेल मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती, संगीत आणि भावनांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या

कार्यक्रमाला संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मैफलीत परमेश्वर लिंगारेड्डी तिप्पनवार यांच्या भावगीतांच्यासादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली. तसेच प्रा. अशोकराव ठोंबरे, सौ. माधुरीताई जाधव, सचिन बोपीलवार आणि कृष्णा बोपीलवार यांनी आपल्या सुमधुर आवाजातून विविध भावगीतांचे सादरीकरण करत मैफलीत रंगत आणली. भावगीतांमधील भावस्पर्शी शब्द, सुरेल स्वर आणि संगीताची मनमोहक अनुभूती यामुळे उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. मंदिर परिसरात भक्तिमय आणि संगीतमय वातावरण निर्माण झाल्याने कोजागिरी पौर्णिमेचा आनंद द्विगुणित झाला. श्री परमेश्वर मंदिरातील या भावगीत मैफलीने धार्मिक उत्सवाला सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झाले. संगीताच्या माध्यमातून भक्तीभाव जागृत करणारा हा कार्यक्रम उपस्थित रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

नरसी येथील यश भिलवंडे राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र

नरसी - येथील रहिवासी व नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी यश सुधाकर भिलवंडे याची १७ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या निवडीमुळे नायगाव तालुक्यातील क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, यशच्या यशाबद्दल शाळेच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात

येत आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील शालेय क्रिकेट स्पर्धांच्या अनुषंगाने लातूर विभागीय स्तरावरील स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या यश सुधाकर भिलवंडे याने स्थान मिळवले आहे. राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा १ ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. खेळाडूंनी १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगाव येथे उपस्थित राहणे अपेक्षित आहे. तसेच ३ नोव्हेंबर रोजी क्रिकेट निवडचाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंना आवश्यक ओळखपत्र, पात्रता प्रमाणपत्र, मागील वर्षाचे गुणपत्रक, जन्मदाखला, आधारकार्ड किंवा पासपोर्ट आदी कागदपत्रे सोबत आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नरसी येथील यश भिलवंडे याने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवल्याने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याच्या या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यस्तरावर नरसीचा यश भिलवंडे कशी कामगिरी करतो, याकडे नायगाव तालुक्यातील क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

माळकौठा शेतकरी मृत्यूप्रकरणी वंचित बहुजन आघाडी आक्रमक

मुदखेड-तालुक्यातील माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूनंतर वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. पीडित कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत द्यावी, त्यांच्या मुलीच्या शिक्षणाचा खर्च उचलावा आणि कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. खासगी

फायनान्स व मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुली पद्धतीची, तसेच कर्जदारांना दिल्या जाणाऱ्या कथित मानसिक त्रासाची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्वतंत्र डखढ मार्फत चौकशी करावी. बेकायदेशीर दबाव, धमकी किंवा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी भूमिका नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष राज आटकोरे व नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शंकर महाजन यांनी मांडली. संबंधित कंपन्यांना राजकीय पाठबळ किंवा स्थानिक अधिकाऱ्यांचे हितसंबंध असल्यास त्यांचीही चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने चंद्रकांत शिंदे यांच्या मुलीच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच, खासगी फायनान्स कंपन्यांकडून त्रास होत असल्यास पीडितांनी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी के. एच. वने, बालाजी सूर्यतळे, राहुल चौदंते यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बांधकाम कामगारांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी २५ हजार सानुग्रह मदत द्या!

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२८ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि बांधकाम व्यवसायातील मंदीमुळे रोजगाराअभावी आर्थिक संकटात सापडलेल्या बांधकाम कामगारांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी २५ हजार रुपये सानुग्रह आर्थिक सहाय्य देण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी नांदेड जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी संघ, नांदेड यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

नांदेड शहर व जिल्ह्यातील बांधकाम मिस्त्री, गवंडी, लेबर (मजूर), हेल्पर, इलेक्ट्रिशियन, प्लंबर, पेंटर व इतर रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना नियमित रोजगार मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. अनेक कामगार दररोज सकाळी नाका, बाजार चौक व अन्य सार्वजनिक ठिकाणी काम मिळण्याच्या अपेक्षेने उभे राहतात. मात्र, कामाची अनिश्चितता आणि आर्थिक अडचणींमुळे अन्नधान्य, घरभाडे, मुलांचे शिक्षण व औषधोपचारांचा खर्च भागविण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे बांधकाम कामगारांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांची अधिकृत नोंदणी करण्याची, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची आणि आर्थिक संकटात असलेल्या पात्र कामगारांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक व इतर मदत मिळवून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनातील मागण्यांवर विहित कालमर्यादेत ठोस कार्यवाही न झाल्यास बांधकाम कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संविधानिक व लोकशाही मार्गाने पुढील पाठपुरावा आणि आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला.

यावेळी उद्धवराव चव्हाण, आकाश चव्हाण, अशोकराज कांबळे, प्रवीण पाटील, जयदीप पैठणे, एजाज शेख आणि शिवाजी गोडबोले यांच्यासह संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भोकर तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सरकारविरोधात जाहीर आंदोलन

तभा वृतसेवा
भोकर, दि.२८ ऑक्टोबर -

भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष गोविंद पाटील बाबा गौड यांच्या नेतृत्वाखाली भोकर तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.२८ रोजी सरकारविरोधात विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयासमोर जाहीर आंदोलन करण्यात आले. आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्तांचा राजीनामा लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकवण्यासाठी ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी शासनाकडून मिळणारा ५,००० रुपयांचा निधी अपुरा असल्याने प्रतिएकरी ५०,००० रुपये तातडीची मदत द्यावी. पीक विम्याची १०० टक्के भरपाई द्यावी पीक नुकसानीचा सामना करणाऱ्या सर्व बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार पीक विम्याची १०० टक्के भरपाई मिळावी. जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यात यावी दुष्काळग्रस्त भागात पुरेशा प्रमाणात चारा छावण्या सुरू करून जनावरांसाठी चारा व पाण्याची तातडीने व्यवस्था करावी.

तीव्र पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये टँकरद्वारे किंवा अन्य पर्यायी माध्यमांतून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा.प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.या आंदोलनाला काँग्रेसच्या विविध संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी, पत्रकार आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रा. यशपाल भिंगे (प्रदेशाध्यक्ष, ओबीसी काँग्रेस कमिटी), श्रीधर पाटील चव्हाण (खासदार प्रा. रविंद्र पाटील चव्हाण यांचे प्रतिनिधी), रेखाताई चव्हाण (जिल्हाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी), विठ्ठल पावडे (जिल्हाध्यक्ष, नांदेड), तिरुपती पाटील कोंढेकर (भोकर विधानसभा नेते), प्रा. बालाजी पाटील गाडे (जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस), सचिन टाले (ओबीसी जिल्हाध्यक्ष), बाळासाहेब देशमुख आंबेगावकर, अनंतवाड गुरुजी, निळकंठ वर्षेवार, लक्ष्मण हिरे, तौसिफ इनामदार (शहराध्यक्ष)मनोरमा अम्मा (महिला तालुकाध्यक्ष), सुरेखाबाई मळे (महिला शहराध्यक्ष), श्यामसुंदर पाटील, प्रमोद देशमुख कामणगावकर, नरेश पाटील कोंडलवार, आदिनाथ चिंताकुटे, धोंडीबा भिसे, माधव शिंदे, सतीश पाटील मातूळकर, शफी इनामदार, सम्राट हिरे, राहुल पुरी, प्रल्हाद सुंकलेकर, संदीप सुरगुलवाड, सुलोचनाबाई ढोले, अनिता साबळे, सुरेखाबाई गजभारे, बंडू पाटील, खंडेराव शेंडगे आणि लक्ष्मण डोंगरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

विजया दशमी निमित्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोहातर्फे शस्त्रपूजन व पथसंचलन

तभा वृतसेवा
लोहा, दि.२८ ऑक्टोबर -

लोहा शहरात दरवर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघा तर्फे विजयादशमी निमित्य शस्त्रपूजन व पथसंचलन केले जाते. हा दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापना दिवस असल्यामुळे या दिवसाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी अनन्य साधारण महत्त्व आहे. तेसच आता संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत त्या अनुषंगाने लोहा शहरात हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

लोहा शहरातील नागरीकांनी मोठ्या संख्येने यामध्ये सहभाग घेऊन रस्त्याने रांगरोगीळी काढून व पथसंचलनावर पुष्पवृष्टी करुन स्वागत केले. पथसंचलन राष्ट्रीय स्वयंसेवक झेंडा वंदन करुन कै.वि.नगळे विद्यालय येथून सुरुवात होऊन बिडवई नगर, देऊळ गल्ली, मुख्य रस्त्याने, शिवकल्याण नगर, माऊली नगर मार्गे परत कै.वि.नळगे विद्यालय येथे परत येऊन पुढील कार्यक्रमाला सुरुवात झाली.

यावेळी उत्सव प्रमुख विठ्ठल अंबेकर प्रमुख वक्ते नितीन पापटवार विभाग कार्यालय प्रमुख,शहर कार्यवाहक गजानन गड्डम,तालुका संघचालक दत्ता बोरलेपवार,बजरंग दल शहर अध्यक्ष योगेश चव्हाण,प्रमुख अतिथी केरबा सावकार बिडवई,हभप.आत्माराम महाराज रामेज्वार तर उपस्थित मान्यवर लोकनियुक्त नगर अध्यक्ष शरद पाटील पवार गटनेते भास्कर पाटील पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, नगरसेवक शंकर सावकार वट्टमवार, माजी

नगरसेवक आप्पाराव पाटील पवार, नगरसेवक प्र.राजेश पाटील बोडके, दिनेश पाटील पवार, नगरसेवक प्र.पंकज परिहार, रमेश इंदुरकर, संजय मक्तेदार, प्रशांत मक्तेदार, संदीप सूर्यवंशी, सोहम चन्नावार ,संतोष पवार, विकास तोताडे,आदिनाथ आळंदे, गजानन भोस्कर, मुदलेश्वर धाबे, राहुल बिडवई,राजेश हुमनाबादे, गिरीश पेनुरकर, डॉ. नळगिरे, गजेंद्र नाईकवाडे, गंगाराम बोईनवाड, गोविंद चालिकवार, मुकुल परळकर, सिद्धेश्वर नाईकवाडे, शिवा तेलंग, भुषण दमकोंडवार, ज्ञानेश्वर पांचाळ,मनोज कवटीकवार, विश्वेश किलजे, चेतन्य धाबे, अनिल खोडवे, ओमकार म्हैत्रे, सुरज संगेवार, अथर्व खपले, गिरीराज बंतकुलवार, गौरव दमकोंडवार, वैजनाथ संगेवार सर्व स्वयंसेवक परिवार,मंडळ उपस्थित होते.

वाडीच्या उपजिल्हा रुग्णालयाचा शुभारंभ एकजुटीने होणार!

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२८ ऑक्टोबर -

मनापमनाच्या नाट्यावर अखेर पडदा

वाडी बुद्रुक येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेतील नावांवरून निर्माण झालेल्या नाराजीचे अखेर निराकरण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन मतभेद बाजूला ठेवण्याचा निर्णय घेतला. रुग्णालयाच्या उद्घाटन सोहळ्यात कोणताही अडथळा येऊ नये, तसेच परिसराच्या विकासाला प्राधान्य मिळावे, या भूमिकेतून गावकऱ्यांनी एकजुटीने कार्यक्रम साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे येत्या १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या रुग्णालयाच्या शुभारंभ थाटात होणार आहे.

वाडी बुद्रुक येथे उभारण्यात आलेले उपजिल्हा रुग्णालय परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रुग्णालयामुळे वाडी बुद्रुक, पावडेवाडी आणि परिसरातील अन्य गावांमधील नागरिकांना उपचारासाठी जवळच सुविधा उपलब्ध होणार असून, दूरच्या रुग्णालयांपर्यंत करावी लागणारी धावपळ आणि गैरसोय कमी होण्यास मदत मिळणार आहे.

या रुग्णालयाच्या उभारणीसाठी आमदार बालाजी कल्याणकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शासकीय आणि प्रशासकीय स्तरावर प्रयत्न करून सुमारे तीन वर्षांच्या परिश्रमानंतर रुग्णालयाचे काम पूर्णत्वाकडे नेण्यात आले. त्यामुळे या रुग्णालयाचा शुभारंभ परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, उद्घाटन सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत काही जणांची नावे नसल्याच्या कारणावरून वाडी बुद्रुक व पावडेवाडी परिसरातील काही ग्रामस्थांसह विरोधी पक्षातील नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे उद्घाटनापूर्वीच कार्यक्रमाभोवती मानापमानाचा वाद निर्माण झाला होता. मात्र, या वादाचा रुग्णालयाच्या उद्घाटनावर परिणाम होऊ नये, यासाठी गावकऱ्यांनी एकत्रित बैठक घेतली.

या बैठकीत नाराजी दूर करून

सर्वांनी एकत्रितपणे उद्घाटन सोहळा साजरा करण्याची भूमिका मांडण्यात आली. रुग्णालय ही संपूर्ण परिसराच्या हिताची सुविधा असून, निमंत्रण पत्रिकेतील नावांपेक्षा नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याची भावना तात्या पावडे आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली. आमदार बालाजी कल्याणकर यांच्या प्रयत्नांतून उभारण्यात आलेल्या या आरोग्य सुविधेच्या उद्घाटनासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यापूर्वी आमदार हेमंत पाटील, आमदार आनंद पाटील बोंढारकर आणि आमदार बालाजी कल्याणकर यांनी रुग्णालयाची पाहणी करून कामाबाबत समाधान व्यक्त केले होते. आता गावकऱ्यांमधील नाराजी दूर झाल्याने उद्घाटन सोहळ्याच्या आयोजनाला गती मिळाली आहे.

निमंत्रण पत्रिकेतील नावांवरून सुरू झालेला वाद मागे पडला असून, परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणे हेच सर्वांचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे या घडामोडीतून स्पष्ट झाले आहे. मानापमानाच्या मुद्द्यांपेक्षा विकासाच्या कामाला प्राधान्य देत गावकऱ्यांनी एकत्रितपणे पुढे येण्याचा निर्णय घेतल्याने १ नोव्हेंबर रोजीचा उपजिल्हा रुग्णालयाचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडणार आहे .

यावेळी संभाजीराव पावडे (तात्या), रमेशराव पावडे, बाळासाहेब पावडे, धनंजय पावडे, उद्धव पावडे, श्याम पावडे, नितीश पावडे,प्रल्हाद पावडे , विठ्ठल पावडे, सचिन पावडे , रवींद्र गिरी, शिवाजी पावडे आदींची उपस्थिती होती.

उद्घाटन सोहळ्याच्या तयारीची नामदार हेमंत पाटील यांनी केली पाहणी

वाडी बुद्रुक येथील १०० खाटांच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयाचा उद्घाटन सोहळा येत्या १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून, उद्घाटन सोहळ्याच्या तयारीचा आढावा नामदार हेमंत पाटील यांनी आज घेतला. प्रत्यक्ष स्थळावर जाऊन त्यांनी पाहणी केली व कार्यक्रमासाठी आवश्यक सूचना दिल्या. यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

माणिक स्मारक विद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक मोहीमेचा शुभारंभ

आरोग्य विभागाच्यावतीने विविध शाळांमध्ये उपक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

आरोग्य विभाग जिल्हा परिषद, हिंगोलीच्या वतीने माणिक स्मारक विद्यालय हिंगोली येथे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यकाम पार पडला.

जिल्ह्यातील १ ते १९ वर्षे वयोगटातील बालक-किशोरवयीन मुला-मुलींना जंतनाशक गोळ्याचे वाटप करण्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली येथील माणिक स्मारक विद्यालयामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस आणि शिक्षण अधिकारी (माध्यमिक) विपुल भागवत जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले की बालकांच्या निरोगी आरोग्यासाठी आणि विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी जंत नाशक गोळी ही दर सहा महिन्यातून एकदा सेवन करणे आवश्यक आहे.आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, यासाठी जंत नाशक मोहीमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. असे त्यांनी स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी जंतनाशक गोळ्याचे सेवन करण्यासाठी पालक व शिक्षकांना आवाहन केले आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी जंतनाशक मोहिमेचे महत्त्व विशद करताना ते म्हणाले की, लहान मुलांमध्ये जंतसंसर्गमुळे होणारा कृमी आजारा मुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर, पोषणावर आणि एकूण आरोग्यावर दुष्परिणाम होतो. आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी जंतनाशक गोळीचे सेवन करणे आवश्यक आहे.

जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना असे सांगितले की शासनाची ही मोहीम बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण असून, जंतनाशक गोळ्यां सेवन केल्यामुळे आतड्यातील जंतसंसर्गावर नियंत्रण मिळविण्यास मदत होते. आणि विद्यार्थ्यांची शारीरिक मानसिक आणि बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी मदत होते.

यावेळी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. एस. राठोड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. दत्ता डुडळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी भाकरे, डॉ. रणजीत मस्के, डॉ. विजय चुकेवार, औषध निर्माण अधिकारी राहुल घुगे, डिपीएचएन मनिषा वडकुते, स्वाती जरांडे, कार्यक्रम सहाय्यक प्रदीप आंधळे, कमलेश इसी, विजय पाठक, नागसेन भालेराव राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथकातील सदस्य आणि शाळेतील शिक्षेक विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक के एस राठोड यांनी आभार मानले

कबड्डी स्पर्धेत संभाजीनगरचा संघ विजेता तर उपविजेता सेलू

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

सार्वजनिक दसरा महोत्सव समिती, हिंगोली यांच्या वतीने महाराष्ट्रातील कबड्डीप्रेमींसाठी भव्य खुल्या पुरुष कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन सोहळा सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलिस कवायत मैदानावर संपन्न झाला ही स्पर्धा प्रकाश झोतात घेण्यात आली. या स्पर्धेत मराठवाडा व विदर्भातील १६ संघाने सहभाग नोंदविला.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळा दसरा महोत्सव समितीचे अध्यक्ष व उद्घाटक समाधान घुटुकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी हिंगोली नगरपालिकेचे शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, राष्ट्रवादी नेते नगरसेवक दिलीप चव्हाण, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. बंकट यादव ,महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे खजिनदार मंगल पांडे, डॉ. प्रा.नवनाथ लोखंडे, मेजर पंढरीनाथ घुगे, दिलीप बांगर, खंडबाराव नाईक, क्रीडा अधिकारी आत्मराम बोथीकर, एन आर राठोड, शेख मुजिब, शेषराव चव्हाण, प्राचार्य डॉ. पंडित शिंदे, प्रभू शिंदे ज्ञानबाराव कोरडे, संघ नायक संघ व्यवस्थापक प्रशिक्षक आणि आजी-माजी खेळाडू यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मेजर पंढरीनाथ घुगे यांनी केले.

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या स्पर्धेसाठी आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली होती. प्रतिस्पर्धी संघांवर मात करत साई क्रीडा मंडळ संभाजीनगर हा संघ विजेता ठरला तर मानस क्रीडा मंडळ सेलू ला उपविजेते पदावर समाधान मानावे लागेल. स्पर्धेतील साई क्रीडा मंडळ संभाजीनगर प्रथम विजेत्या संघाला ४१ हजार रुपये, मानस क्रीडा मंडळ सेलू द्वितीय क्रमांकाच्या संघाला २१ हजार रुपये, राज्य राखीव दल हिंगोली तृतीय क्रमांकाच्या संघाला १५ हजार रुपये, तर मानस क्रीडा मंडळ वाशिम चतुर्थ क्रमांकाच्या संघाला ११ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच म्हणून मेहराजखान पठाण, डॉ. शिवशंकर कापसे, ज्योतीराम चव्हाण, गजानन राठोड, बल्लू पठाण, सत्यप्रकाश नांदापूरकर, शमी पटेल, गणपत नरवाडे, मोतीराम कोरडे, विशाल शिंदे, सुनील बांगर, बापूराव सांडे, आर डी देशमुख, जफरखान पठाण, रावसाहेब गेंडाफळे ,विकास काळे समद अमोदी, रामदास हनमंते आदीने पंच म्हणून कार्य केले. सार्वजनिक दसरा महोत्सव समिती, हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि हिंगोली तालुका कबड्डी असोसिएशन यांच्याकडून दत्तरावजी बांगर, उमेश बांगर, सुभाष दराडे यांनी परिश्रम घेऊन पुढाकार घेतला. कबड्डी हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकप्रिय आणि पारंपरिक खेळ असून, या खेळातून शारीरिक क्षमता, चपळता, सांघिक भावना, शिस्त आणि खिलाडूवृत्ती यांचा विकास होतो. हिंगोलीत आयोजित करण्यात आलेल्या या खुल्या पुरुष कबड्डी स्पर्धेमुळे स्थानिक तसेच विविध भागांतील कबड्डीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध झाली असे उद्गार कार्यक्रमाचे उद्घाटक उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी व्यक्त केले.

तालुका क्रिडा संकुलनात दारूड्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

औंढा शहरातील तालुका क्रीडा संकुलनातील अस्वच्छता व दारू पिणाऱ्या लोकांचा त्रास थांबवण्याच्या संदर्भात औंढा नागनाथ शहरातील तरुणांनी तहसील कार्यालयात निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद, औंढा नागनाथ येथील तालुका क्रीडा संकुलनाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या फुटलेल्या काचा व इतर कचरा पडला आहे. काही लोक रात्रीच्या वेळी दारू पिऊन बाटल्या ठिकाणी सोडून अथवा फोडून जात असल्यामुळे परिसरात स्वच्छता निर्माण झाली आहे. आगामी येणाऱ्या पोलीस भरती करिता शेकडो युवक त्या ठिकाणी तयारी करण्यासाठी येतात. खेळाडू व गावातील नागरिक व्यायाम करण्याकरिता येतात. फुटलेल्या काचामुळे खेळाडू व नागरिकांना दुखापत होत आहे. तरी याकडे तालुका क्रीडा अधिकाऱ्याने तातडीने लक्ष देऊन क्रीडा संकुलनाची स्वच्छता करून घ्यावी. तसेच परिसरात दारू पिणाऱ्या व अस्वच्छता करणाऱ्या वर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे शहरातील ग्रामस्थ व तरुण युवकांनी केली आहे. मुस्ताक इसाक शेख, शेख अब्दुल बाशीद, हरीश इखे, अथर्व चिलगर, श्रीकांत अंभोरे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

संक्षिप्त वृत्त

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ध्वजारोहन

हिंगोली- येथील सिध्दार्थ मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्यावतीने धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त ध्वजारोहणासह विविध कार्यक्रम घेण्यात आले. संस्थेच्या सचिव प्रयागबाई हनवते यांच्या हस्ते पंचरंगी ध्वज व निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी कोषाध्यक्षा लताबाई भुक्तर, कविता मोरे, गिताबाई दिपके, उषा इंगोले, संगीता वाकळे, विमल पंडित, मिनाबाई राऊत आदींची उपस्थिती होती. त्यानंतर मुख्य कार्यक्रम संस्थेच्या तक्षशिला बुध्दविहार येथे संपन्न झाला. या ठिकाणी पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजाचे संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीबाई इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्रिशरण पंचशिल व बुध्दवंदना घेण्यात आली. या कार्यक्रमास भारतीय बौध्द महासभेचे विनित उबाळे यांच्यासह सचिव प्रयागबाई हनवते, रूखमिनीबाई पुंडगे, भाऊराव पंडित, अनुप हनवते, ब्रम्हानंद भुक्तर, सदानंद सरकटे, यांच्यासह विशाखा महिला मंडळच्या महिला, कॉलनीतील नागरीक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रकाश इंगोले यांनी केले. आभार अनुप हनवते यांनी मानले.

महावितरणमधील रिक्तपदे तत्काळ भरण्याची भाजपची मागणी

शिवाजी मुटकुळे यांनी घेतली संचालकांची भेट

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

हिंगोली विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या रिक्त पदांबाबत महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांची नुकतीच भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी भेट घेतली तसेच त्यांना निवेदन सादर केले.

हिंगोली विधानसभा मतदारसंघातील विज ग्राहक, शेतकरी आणि नागरिकांच्या भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तसेच महावितरणची सेवा अधिक सक्षम व गतीमान करण्यासाठी रिक्त पदे तत्काळ भरण्याची गरज असल्याचे भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी संचालक धनंजय औंढेकर यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी श्री औंढेकर यांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेवून तातडीने पावले उचलण्यात येतील असे आश्वासन दिले. यावेळी भाजपकडून हिंगोली जिल्हा व विधानसभा मतदारसंघातील महावितरण कंपनीअंतर्गत विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्यात यावीत असे लेखी निवेदन सादर केले.

पाण्याचा अपव्यय केल्यास नळजोडणी तोडण्याचा नगर पालिकेचा इशारा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

सिध्देश्वर धरणात केवळ ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या धरणातील पाण्यातून हिंगोली शहराला नळाद्वारे पाणीपूरवठा केल्या जातो. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नळाला तोटी बसवून घ्यावी अन्यथा नळजोडणी तोडण्याचा इशारा नगर पालिका प्रशासनाने दिला आहे.

राज्यात यंदा कमी पाऊस पडल्यामुळे धरणे पूर्ण क्षमतेने भरली नाहीत परिणामी धरणात आला मोजकाच पाणीसाठा शिल्लक आहे. हिंगोली शहराला सिध्देश्वर धरणातील पाण्यातून नळाद्वारे पाणीपुरवठा केल्या जातो. यंदा धरणात सद्यस्थितीत केवळ ३५ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. जून २०२७ पर्यंत पाणीपुरवठा होणे कठीण जाणार असल्याचे चित्र आतापासूनच दिसत आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आता जिल्हा प्रशासन, नगर पालिका प्रशासनाला कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

धरणात उपलब्ध पाण्यापैकी काही पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय पाटबंधारे विभागाने घेतला आहे. त्यानुसार राखीव पाण्यातूनच शहराला पाणीपुरवठा केला जाणार आहे. दरम्यान, हिंगोली शहरातील १७ प्रभागांमधील नागरिकांना योग्य दाबाने व मुबलक पाणी पुरवठा केला जातो. मात्र यावर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी पुरवठ्यामध्ये १० टक्के कपात करण्यात आली आहे. तर नागरिकांनीही पाण्याची बचत करावी, पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन नगराध्यक्ष रेखा श्रीराम बांगर आणि मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांनी केले आहे.

नगर पालिकेने नुकतेच प्रसिध्दी पत्रक जारी केले असून त्यामध्ये नागरिकांनी घरातील नळांमधून पाण्याची गळती होत असल्यास संबंधित नळांची तत्काळ दुरूस्ती करून घ्यावी, पाणी भरून झाल्यानंतर नळ व्यवस्थीत बंद करता यावा आणि पाण्याचा अपव्यय टाळता यावा यासाठी प्रत्येक नळाला योग्य प्रकारची तोटी किंवा नळ बंद करण्याची व्यवस्था करावी. पाण्याचा काटकसरीने वापर करणे, नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होण्यास मदत करणे आवश्यक असून नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.

शांताबाई दराडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विविध क्रिडा स्पर्धेत विभागीय पातळीवर निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने आयोजित विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. कुस्ती, तायक्कांदो, धनुर्विद्या, गोळाफेक आणि कराटे या क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत भर घातली.

तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत शिवम सावळे आणि शिवम मुटकुळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर सुमित कदम, सार्थक शिंदे आणि विश्वजीत मस्के यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत शिवम तुकाराम सावळे याने प्रथम क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले.

जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत वरद उमेश घुगे याने प्रथम क्रमांक पटकाविला. जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत कु. धनश्री संजय गुठ्ठे हिने द्वितीय क्रमांक मिळविला.तालुकास्तरीय गोळाफेक स्पर्धेत कु. प्रणाली चंद्रमुनी आठवले हिने प्रथम क्रमांक संपादन केला.

जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत विविध वजनगटांत कु. आरती राजेश्वर धाबे, कबीर सिद्धार्थ गोवंदे आणि संघपाल रवींद्र नरवाडे यांनी प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे आणि उपमुख्याध्यापक श्री. अनिल लोळेवार यांच्या हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबराव नाईक व सर्व संचालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचे अभिनंदन केले आणि आगामी विभागीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने हे यश साध्य झाले असून, आगामी स्पर्धांमध्येही विद्यार्थी उत्तम कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

बालकांच्या लैंगिक शोषणाविरोधात जनजागृतीसाठी सुरक्षित बचपन अभियान कार्यक्रम संपन्न

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ ऑक्टोबर

बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ (पोक्सो कायदा) याविषयी जनजागृती करण्यासाठी अखिल भारतीय शालेय जनजागृती मोहिमेअंतर्गत तालुका विधी सेवा समिती, हिंगोलीतर्फे सरजुदेवी भिकुलाल भारूका आर्य कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'सुरक्षित बचपन अभियान' राबविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दुसऱ्या सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, हिंगोली येथील न्यायाधीश श्रीमती एस. एस. पळसुले होत्या. जिल्हा वकील संघाच्या ॲड. श्रीमती आर. एन. शर्मा यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस. आर. घुगे आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. एस. गुंडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. श्रीमती आर. एन. शर्मा यांनी बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ मधील तरतुदी, लैंगिक अत्याचाराविरोधात तक्रार करण्याची प्रक्रिया, तक्रार नोंदविण्याची केंद्रे आणि उपलब्ध समुपदेशन सुविधांविषयी माहिती दिली. चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यातील फरक ओळखणे, अनुचित प्रसंग घडल्यास विश्वासू व्यक्तीला सांगणे आणि मदत मागणे याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. अन्यायाविरोधात न घाबरता आवाज उठविण्याचे आवाहनही त्यांनी केले. मुख्याध्यापिका श्रीमती एस. एस. गुंडेकर यांनी विद्यार्थिनींना या कायद्याविषयी देण्यात आलेली माहिती आत्मसात करून तिचा दैनंदिन जीवनात उपयोग करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात न्यायाधीश श्रीमती एस. एस. पळसुले यांनी बालपणातील सुरक्षित वातावरणाचे महत्त्व विशद केले. बालकांना आनंदाने आणि निर्भयपणे जगण्याचा अधिकार असून, त्यांच्या संरक्षणासाठी न्यायव्यवस्था कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी कायद्यातील तरतुदींची माहिती देत राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध सेवा व सुविधा बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तालुका विधी सेवा समिती तत्पर असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी विद्यार्थिनींना माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. एम. ए. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर विद्यालयाचे सहशिक्षक एम. एस. देशपांडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. अभियानाच्या आयोजनासाठी तालुका विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपिक डी. बी. हनवते आणि कनिष्ठ लिपिक एन. एस. दिंडे यांनी विद्यालयातील शिक्षकांच्या सहकार्याने कामकाज पार पाडले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थिनीची उपस्थिती होती.